




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

मंगळवार, दि. ०२ डिसेंबर २०२५








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : ०२० | किंमत : ४.०० रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com | Gmail : punegavkari@gmail.com





# मतदान आज, निकाल कधी?

- उच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे सर्वांचेच लक्ष
- निवडणुकांचा तिढा, जनतेचा कौल कधी समोर येणार



**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा ताण-तणाव वाढत असताना, मतमोजणीच्या तारखेबाबत आता मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. सुरुवातीला राज्य निवडणूक आयोगाने 2 डिसेंबरला मतदान आणि 3 डिसेंबरला निकाल जाहीर होईल, असे सांगितले होते. मात्र काही नगरपरिषद आणि नगरपंचायतींमध्ये न्यायालयीन पेच निर्माण झाल्याने आयोगाने आपल्या कार्यक्रमात बदल करत, ज्या ठिकाणी वाद सुरू आहे, तेथे 20 डिसेंबर मतदान व 21 डिसेंबरला निकाल असा नवीन आदेश देऊन परिस्थिती अधिक गुंतागुंतीची केली आहे. याच पार्श्वभूमीवर आता मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने महत्त्वाचा सवाल उपस्थित केला आहे. एका ठिकाणी 21 डिसेंबरला तर दुसरीकडे 3 डिसेंबरला निकाल, अशा दुहेरी तारखांमुळे जनतेला काय माहिती घ्यायची? असा प्रश्न सर्वत्र निर्माण झाला आहे. खंडपीठाने सोमवारच्या सुनावणीत निवडणूक आयोगाच्या वकिलांना थेट विचारणा केली, सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांचे निकाल 21 डिसेंबरलाच देता येतील का? न्यायालयाने विचारलेल्या या प्रश्नामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे झाले आहे. आयोगाच्या वकिलांनी मात्र यावर तात्काळ उत्तर न देता, आज दुपारी यासंदर्भातील निवेदन सादर करू असे सांगितले आहे. म्हणजेच आजच निर्णय स्पष्ट होण्याची शक्यता आहे. न्यायालयाने सांगितले की, ज्या ठिकाणी तयारी पूर्ण असून मतदान होणार आहे, तिथे निवडणूक निर्विघ्नपणे होऊ द्यावी. मात्र निकालाच्या तारखेवरचा अंतिम निर्णय न्यायालयाच्याच शब्दात बांधला जाईल, हे स्पष्ट झाले आहे. सध्या पैठण, कोपरगाव, अंबाजोगाई आणि उदगीर या नगरपरिषद क्षेत्रांतील याचिकांवर सुनावणी सुरू आहे.

निवडणूक अधिकाऱ्यांनी सर्व तयारी पूर्ण केल्याचे प्रतिज्ञापत्र न्यायालयाकडे सादर केले आहे. मतदान असलेल्या सर्व क्षेत्रांमध्ये यंत्रणा केंद्रावर पोहोचली असून, कर्मचाऱ्यांनी आपली तयारी दाखवली आहे. त्यामुळे मतदान थांबवणे योग्य नाही, असे मत न्यायालयाने स्पष्ट केले. तथापि निकालाची तारीख पुढे ढकलल्यास जनतेच्या मनातील संभ्रम आणि राजकीय तणाव यावर अधिक परिणाम होऊ शकतो, असे निरीक्षणही न्यायाधीशांनी नोंदवले.

दरम्यान, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 8 ते 10 वर्षांनंतर होत असल्याने मतदारांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. आज राज्यातील 264 नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी मतदान होत आहे. सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 अशी मतदानाची वेळ असून, यासाठी 12 हजार 316 मतदान केंद्रांवर 62 हजार 108 अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. सुरक्षेसाठी पोलिस दलाचा मजबूत ताफा तैनात आहे. ग्रामीण आणि निमशहरी भागांमध्ये मतदारांचा उत्साह पाहायला मिळत असून, कोणाचा झेंडा सर्वाधिक उंच जातो हे पाहण्यासाठी साऱ्या राज्याचे लक्ष मतपेटीकडे लागले आहे.

> मतमोजणीचा दिवसच निश्चित नसल्याने उमेदवार आणि कार्यकर्त्यांमध्ये मात्र बेचैनीचे वातावरण आहे. मतदारांनी दाखवलेला विश्वास नेमका कधी उघड होणार? निवडणूक आयोग पुन्हा कार्यक्रमात बदल करणार का? न्यायालयाचा आदेश कोणत्या दिशेने वळणार? या प्रश्नांची उत्तरे मिळेपर्यंत राजकीय तणाव वाढत जाण्याचीच शक्यता आहे. एकीकडे लोकशाही सण साजरा करण्याची तयारी असताना, निवडणूक प्रक्रियेतील या विसंगतीमुळे नागरिकांमध्ये अविश्वास वाढू नये, हीच मोठी चिंता आहे. त्यामुळे आज दुपारी निवडणूक आयोग काय निवेदन देतो, याकडे फक्त राज्यातीलच नव्हे तर सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

# शिंदे, पवार यांच्यासह वीस नेत्यांची वादग्रस्त वक्तव्ये : अहवाल मागवला

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**




राज्यात नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकीच्या प्रचारात सत्ताधारी महायुतीतील मित्रपक्षांतच चढाओढ दिसून आली. प्रचारसभांमध्ये एकमेकांवर कुरघोड्या आणि टीकाटिप्पणी करण्याची स्पर्धा सुरू असताना मतदारांना प्रलोभने देणारी महायुतीतील बड्या नेत्यांच्या वक्तव्यांची निवडणूक आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, मंत्री गुलाबराव पाटील, संजय शिरसाट, जयकुमार गोरे, भाजप आमदार चित्रा वाघ यांच्यासह एकूण २० जणांच्या भाषणांची निवडणूक आयोगाकडून तपासणी होणार आहे. यासाठी निवडणूक आयोगाने जिल्हाधिका-यांकडून अहवाल मागवला आहे. त्यामुळे मतदारांना आकर्षित करणारी वक्तव्य महायुतीतील बड्या नेत्यांना भोवण्याची शक्यता आहे.

दहा दिवसाच्या प्रचारात महायुतीतील प्रमुख नेत्यांनी राज्यभरात सभा घेतल्या. यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री गुलाबराव पाटील, संजय शिरसाट, भाजपच्या नेत्या चित्रा वाघ अशा बड्या नेत्यांनी सभांचा सपाटाच लावला होता. नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकीत आपल्या पक्षाच्या अधिकाधिक जागा निवडून याव्यात यासाठी महायुतीतील प्रमुख नेत्यांसह मंत्र्यांनी ही सभेच्या माध्यमातून आपल्या पक्षाला मतदान करा, अशी साद घातली.

## मटण खा कोणचेही, मात्र बटण दाबा कमळाचे

प्रचारसभेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तिजोरीच्या चाव्या माझ्याकडे आहे तर अजित पवार यांनी अर्थ खात्याच्या कारभार त्यांच्याकडे असल्याने निधीला कात्री लावण्याचे वक्तव्य केले होते, तर चित्रा वाघ यांनी 'मटण खा कोणचेही, बटण दाबा कमळाचे' असे वक्तव्य केले, तर मंत्री गुलाबराव पाटील यांनी 'मतदानाच्या आदल्या दिवशी घराबाहेर थांबा, लक्ष्मीदर्शन होईल' असे वक्तव्य केले होते. प्रचारकाळात तब्बल २० नेत्यांनी अशा प्रकारची मतदारांना प्रलोभणे देणारी वक्तव्ये केली.

## थोडक्यात...

### युती धर्म तोडण्याची सुरुवात शिंदे गटानेच केली

**मुंबई (समर्थ गांवकरी) :** नगर परिषद आणि नगरपंचायत निवडणुकीच्या निमित्ताने महायुतीमध्ये पडलेली फूट आता चव्हाट्यावर आली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात शिंदे गटाचे आमदार नीलेश राणे आणि भाजप यांच्यातील संघर्ष शिगेला पोहोचला असतानाच, भाजपने आता थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षावर गंभीर आरोप केला आहे. "सिंधुदुर्गात शिंदे गटाने भाजपला विरोध करण्यासाठी चक्क उद्धव ठाकरेंच्या पक्षाला सोबत घेतले. त्यामुळे युतीधर्म तोडण्याची सुरुवात शिंदे गटाकडूनच झाली आहे," असा घणाघात भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी केला आहे. भाजप आणि शिवसेना शिंदे गटातील वादाची सुरुवात सिंधुदुर्गपासून झाली. सिंधुदुर्ग जिल्ह्यात भाजप नेते नीतेश राणे आणि शिंदे गटाचे आमदार नीलेश राणे हे सख्खे भाऊच राजकीय रणांगणात आमनेसामने आले आहेत. मालवणमध्ये नीलेश राणे यांनी भाजप पदाधिकाऱ्याच्या घरावर टाकलेली धाड आणि 25 लाखांच्या रोकडवरून केलेले 'स्टिंग ऑपरेशन' यामुळे हा वाद विकोपाला गेला आहे. त्यातच भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी "मला 2 डिसेंबरपर्यंत युती टिकवायची आहे," असे सूचक विधान केल्याने भाजपच्या मनातील खदखद बाहेर आली आहे. आता भाजपचे माध्यम प्रमुख नवनाथ बन यांनी थेट शिंदे गटावरच आरोप केलेत.

# एकनाथ शिंदेंच्या काळ्या बॅगा पुन्हा चर्चेत, कोकणातील व्हिडिओ समोर

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मालवण नगरपालिका निवडणुकीत राजकीय वातावरण दिवसेंदिवस अधिक चुरशीचे होत चालले आहे. निवडणूक जवळ येत असताना आरोप-प्रत्यारोपांची मालिका अधिकच तापते आहे. नुकतेच भाजपवर पैसे वाटपाचे आरोप करण्यात आले होते. या आरोपांवरून शिंदे गट आणि भाजपमध्ये संघर्ष वाढला. परंतु आता स्वतः शिंदे गटावरच मतदारांमध्ये पैसे वाटल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. शिवसेना ठाकरे गटाचे माजी आमदार वैभव नाईक तसेच खासदार संजय राऊत यांनी शिंदे गटाचे नेते नीलेश राणे यांच्यावर थेट निशाणा साधला आहे. त्यांनी एक व्हिडीओ आपल्या सोशल मीडियावर शेअर करत मोठा दावा केला असून, त्यामुळे मालवणच्या निवडणूक राजकारणात नवे वादळ उठले आहे. वैभव नाईक यांच्या मते, काही दिवसांपूर्वी मालवण दौऱ्यावर आलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आपल्यासोबत पैशांच्या बॅगा घेऊन आले होते. हा पैसा कार्यकर्त्यांमार्फत मतदारांपर्यंत पोहोचवला गेला, असा त्यांचा आरोप आहे. त्यांनी व्हिडीओ दाखवत असा दावा केला की शिंदे यांच्या अंगरक्षकांनी कॅमेरापासून लपवत मोठ्या बॅगा उतरवल्या. हे दृश्य म्हणजे राजकीय भ्रष्टाचाराचे प्रत्यक्ष उदाहरण असल्याचे नाईक यांनी म्हटले आहे. त्यांनी हे पैसेच नीलेश राणे यांनी निवडणूकपूर्व रात्री मतदारांमध्ये वाटले, असा दावा केला आहे.

# सहलीहून परतणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बसला अपघात

- नाशिकचे 30 ते 32 विद्यार्थी जखमी
- पुणे - बंगळुरू महामार्गावरील कराड लगतची घटना

**सातारा : (समर्थ गांवकरी)**



कोकण सहलीवरून परतणाऱ्या नाशिकच्या विद्यार्थ्यांच्या एका बसला मंगळवारी सकाळी पुणे - बंगळुरू महामार्गावर भीषण अपघात झाला. त्यात जवळपास 30 ते 32 विद्यार्थी जखमी झालेत. जखमींपैकी 5 विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यामुळे त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

यासंबंधीच्या माहितीनुसार, अपघातग्रस्त बस नाशिकच्या निफाड तालुक्यातील पिंपळगाव येथील लेट बी पी ज्यूनिअर कॉलेज ऑफ सायन्स महाविद्यालयाची होती. ही बस पुणे बंगळुरू महामार्गावर साताऱ्यातील कराड लगतच्या वाठार गावच्या हद्दीत 20 फूट खोल दरीत कोसळली. त्यात बसमधील 30 ते 35 विद्यार्थी व शिक्षक जखमी झाले. जखमींपैकी 5 जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. त्यांच्यावर लगतच्या कृष्णा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

निफाडच्या पिंपळगाव बसवंत येथील महाविद्यालयीन विद्यार्थी शैक्षणिक सहलीसाठी कोकणला गेले होते. सहल आटोपून ते रात्री उशिरा नाशिकच्या दिशेने जात होते. रस्त्यात कराडच्या वाठार गावालगत मंगळवारी पहाटे त्यांची बस चालकाचे नियंत्रण सुटून रस्त्याशेजारच्या 20 फूट खोल दरीत कोसळली. हा अपघात घडला त्या ठिकाणी रस्त्याचे काम सुरू होते. रस्त्याचा एक भाग दबला होता. त्यामुळे चालकाला त्याचा अंदाज आला नाही. या दबलेल्या भागातून बस घसरून रस्त्यालगतच्या 20 फूट खोल दरीत कोसळली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

हा अपघात घडला त्यावेळी बस भरधाव वेगात होती. त्यामुळे बसचे मोठे नुकसान झाले आहे. अपघात घडल्यानंतर घटनास्थळी एकच आरडाओरडा सुरू झाला. हा आवाज ऐकून परिसरातील ग्रामस्थांनी घटनास्थळाच्या दिशेने धाव घेऊन बचावकार्य सुरू केले.


**Adarsh Engineering Services**

* ITI NCVT Disel Mechanic & ITI Electrical Experience Holder Required
* Fild Work Diesel Generator Service Engineer

Contact - Dasharth Chavan
9004511593
Email - aes1540@gmail.com

डिझेल इंजिन आयटीआय इंजिनियर्सची आवश्यकता आहे.
इलेक्ट्रिकल विद्युत जन्सेट कारागीर पाहिजे.
कामाचा अनुभव असणे आवश्यक
डिझेल जनरेटर या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.








# सावरगाव येथील सोयाबीन टोळी अटक

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

जुन्नरच्या पश्चिम भागामध्ये गेली काही वर्षांपासून शेतकऱ्यांचे सोयाबीन चोरणारी टोळी सक्रिय झालेली आहे . सावरगाव मध्ये सोयाबीन चोरणारी टोळी पकडण्यात स्थानिक गुन्हे शाखा पुणे यांना यश आले आहे. जुन्नर पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखा पुणे ग्रामीण यांच्या कार्यपद्धतीने गेल्या वर्षी कुमशेत येथील सोयाबीन चोरी पकडण्यामध्ये यश आलेले आहे . यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे. जुन्नर



पोलीस स्टेशन येथे सुदर्शन रामचंद्र मनसुख रा. एकनाथ वाडी / सावरगाव यांनी फिर्याद दिली की , शेतामध्ये झाकून ठेवलेले अंदाजे १००० किलो सोयाबीन आज्ञात व्यक्तीने शुक्रवार दिनांक १४ नोव्हेंबर पहाटे ५ वा . चोरी केली . स्थानिक गुन्हे शाखा पथक पुणे यांनी याबाबत चौकशी सुरू केली . या दरम्यान सीसीटीव्ही तपासणीमध्ये दोन मोटरसायकल वरील चार संशयित इसम असल्याचा सुगावा लागला .

स्थानिक गुन्हे शाखा पथक घोडेगाव परिसरात आरोपींची शोध घेत असताना गोपनिय तपासत मार्फत माहिती मिळाली की , दोन मोटर सायकल वरील इसम सागर जाधव , समीर भालेकर व इतर दोन जोडीदार वाडाचीवाडी / चास . तालुका आंबेगाव या ठिकाणी आपल्या बाबत खबर मिळाली . सागर रमेश जाधव , समीर संतोष भालेकर , आकाश बाळश्रीराम काळे , दीपक गौतम काळे हे आरोपी वाडाचीवाडी .तालुका आंबेगाव या ठिकाणी दोन मोटरसायकल तसेच सोयाबीन अंदाजे १ ,३७ ,२०० / -रुपयाचा सोयाबीन मुद्देमालासह सापडला आहे

या आरोपींना जुन्नर पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ३६४ / २०२५ भारतीय न्याय संहिता २०२३कलम ३०३[२] प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे .



जुन्नर तालुका : जुन्नर येथील गुरुवर्य कोंडाजी बाबा डेरे आश्रमामध्ये डिसेंट फाउंडेशन पुणे व शंकरा आय हॉस्पिटल पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न झाले. विघ्नहर्ता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल नारायणगाव यांच्या वतीने देखील विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या.या शिबिराला परिसरातील नागरिकां नी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या शिबिरात एकूण १३८ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली,तर ४६ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी शंकरा आय हॉस्पिटल पनवेल येथे पाठविण्यात आले.

## थोडक्यात बातम्या...




### खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये संजय लोखंडे यास सुवर्णपदक

पाथर्डी (स. गांवकरी) : महाराजा गंगासिंग विद्यापीठ, बिकानेर, राजस्थान येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स, वेटलिफ्टींग स्पर्धेत बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचा विद्यार्थी संजय लोखंडे याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना ६५ किलो वजन गटात १०७ किलो स्नॅच व १३७ किलो क्लीन अँड जर्क असे एकूण २४४ किलो वजन उचलून सुवर्ण पदक पटकावले. या पूर्वी संजय याने पुणे येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य मिनी ऑलिम्पिक गेम्स मध्ये अहिल्या नगर जिल्ह्यास रौप्य पदक मिळवून दिले होते. तसेच अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सलग चार वर्ष प्रतिनिधित्व केले आहे. त्याला महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. विजय देशमुख, प्रा. सचिन शिरसाट यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्रा. डॉ. विजय देशमुख यांची सलग पाचव्यांदा खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स, वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघाच्या मार्गदर्शकपदी निवड झाली आहे. या यशाबद्दल त्यांचे पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष ॲड. सुरेशराव आव्हाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. ए. चौरे यांनी अभिनंदन केले.

### गुरुदत्त भक्ती धाम मंदिरात गुरुवारी अभंगावली ग्रंथाचे पारायण व महाआरती



अहिल्यानगर (स. गांवकरी) : श्री दत्तात्रेय भगवान व श्री समर्थ सद्‌गुरु किसनगिरी बाबांच्या कृपाशिर्वादाने व गुरूवर्य भास्करगिरी महाराज व प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या प्रेरणेने गुरुदत्त भक्तिधाम, संत किसनगिरीनगर येथे आठ वर्षांपासून श्री दत्त जयंती महोत्सव साजरा होत आहे. श्री दत्त जयंती महोत्सवानिमित्त गुरुवार दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी पाइपलाइन रोड येथील संत किसनगिरीनगर येथे गुरुदत्त भक्तिधाम मंदिरात सकाळी ६ ते ८ या वेळेत अभिषेक नित्यपुजा व आरती होईल. सकाळी ९.३० ते १२ या वेळेत अभंगावली ग्रंथाचे पारायण व महाआरती करण्यात येणार आहे.दुपारी ४वाजता सामुदायिक हरिपाठ होईल. सायं.६ ते ७या वेळेत श्री दत्तात्रय भगवान जन्म सोहळा, पाळणा व महाआरती करण्यात येईल.

### श्रमाला प्रतिष्ठा येते : प्रा. विठ्ठल बरसमवाड; श्रमसंस्कार शिबिर

पाथर्डी (स. गांवकरी) : राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक सलोखा वाढतो. देशाप्रती राष्ट्रप्रेम वाढू लागते. श्रमदानाची भावना जोपासली जाते. तसेच श्रमाची प्रतिष्ठा वाढते.त्याच्या मनावर चांगले संस्कार होतात. आपण सर्वजण एक आहोत. याची जाणीव जागृती विद्यार्थ्यांत निर्माण होते.त्यामुळेच विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडतात. आणि त्यांनी केलेल्या परिश्रमाला प्रतिष्ठा निर्माण होते.असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक, तालुक्यातील येळी येथील माध्यमिक शिक्षक प्रा. विठ्ठल बरसमवाड यांनी शिबिरार्थींना केले. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू आर्टस् ,कॉमर्स अँड सायन्स कॉलेज,कनिष्ठ महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी श्रमसंस्कारशिबिर दि.26 नोव्हेंबर ते 2 डिसेंबर या कालावधीत आयोजित केले होते."अमृताचे बोल" या विशेष उपक्रमाद्वारे 'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमातून त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. छोट्या छोट्या गोष्टीतून त्यांनी विद्यार्थ्यांचे मने जिंकली. वाचाल तर वाचाल म्हणून ग्रंथाचे महत्त्व विशद केले.यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रा.सुचिता कुलट,प्रा.प्रभावती पदिर, शिबिरार्थी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.दत्तात्रय नकुलवाड यांनी केले तर आभार प्रा. बाबासाहेब दुधाडे यांनी मानले.

### मतदारांनी निर्भिडपणे मतदान करावे : डॉ. शारदा चौंडेकर

किनवट (स. गांवकरी) : नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ मंगळवारी दि २ डिसेंबर रोजी होत असून निवडणूक मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाल्याची माहिती तहसीलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. शारदा चौंडेकर यांनी दिली. मतदानाचा हक्क निर्भिडपणे बजावण्यासाठी प्रत्येक मतदाराने मतदान केंद्रावर सकाळपासून उत्साहाने हजेरी लावावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार सर्व पूर्वतयारी पूर्ण झाली असून किनवट नगर परिषद क्षेत्रातील १० प्रभागांमध्ये अध्यक्ष पदासाठी ८ उमेदवार आणि २१ नगरसेवक पदांसाठी ९२ उमेदवार रिंगणात आहेत. तर शहरातील एकूण मतदारसंख्या २५, ५९३ असून त्यापैकी पुरुष १२, ३३४, स्त्री मतदार १३, २५६ आणि इतर ०३ आहेत. २९ मतदान केंद्रे – एकही संवेदनशील नाही : शहरात २९ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली असून यापैकी एकही केंद्र संवेदनशील किंवा अतिसंवेदनशील नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# घरात घुसून बिबट्याकडून कोंबड्या फस्त

- जनावरांवर हल्ल्याचा प्रयत्न!
- वनविभागाचे दुर्लक्ष – गावकऱ्यांची तातडीने पिंजरा लावण्याची मागणी!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यात बिबट्यांचा मुक्त संचार वाढत असून ग्रामीण भागात वन्यप्राण्यांचा धडकी भरवणारा वावर दिवसेंदिवस गंभीर स्वरूप धारण करत आहे. तालुक्यातील एकदरे चंदगीरवाडी येथे पहाटे तीनच्या सुमारास घडलेल्या घटनेने ग्रामस्थांच्या मनात भीतीचे सावट आणखी दाट झाले आहे.




पहाटेच्या सुमारास संतू रामा भांगरे यांच्या राहत्या घराचा दरवाजा तोडून बिबट्या थेट घरात घुसला. घराशेजारील गोठ्यात असलेल्या कोंबड्यांवर त्याने हल्ला चढवत अनेक कोंबड्या फस्त केल्या. त्यानंतर घरातच बांधलेल्या शेळ्यांवर व इतर जनावरांवर झडप घालण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यात काही जनावरे किरकोळ जखमी झाली असून शेती व पशुधनाचे हजारो रुपयांचे मोठे नुकसान झाले आहे.

संतू भांगरे यांच्याकडे लहान मुले असल्यामुळे संपूर्ण कुटुंब भीतीने थरथर कापत होते. रात्री लाईट नसल्यामुळे विरोध करणे किंवा काही उपाय करणे शक्य झाले नाही. जवळपास एक तास बिबट्या घरामध्येच फिरत होता, ही अत्यंत धोकादायक बाब असल्याचे ग्रामस्थ सांगतात.

भांगरे कुटुंब हे झापस्तीवर राहत असल्याने रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत बिबट्याचा वावर वाढत असल्याचे ते सांगतात. “वनविभागाने आमची गरीबाची जाण ठेवून तातडीने मदत करावी. आमच्या कुटुंबाला धोका असून उद्या काही मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे.

बिबट्याला पिंजरा लावून पकडण्यात यावे,” अशी मागणी संतू भांगरे व गावकरी वर्गाने केली आहे. दरम्यान, या घटनेनंतर एकदरे परिसरात पूर्ण भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांनी वनविभागाकडे पिंजरा बसवण्याची आणि बिबट्यांची हालचाल नियंत्रणात आणण्याची तातडीची मागणी केली आहे.

# जिव्हाळ्याच्या अश्रूंचा बांध फुटला

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

नांदेड जिल्ह्याचे शेवटचे टोक बालाघाटच्या डोंगराच्या कुशीत वसलेलं कदम वाडी ता .लोहा स्वातंत्र्य काळापासून विकासापासून वंचित असलेलं छोटसं गाव येथे जि.प. प्राथमिक शाळा चौथीपर्यंत व पुढील शिक्षणासाठी दगड सांगवी येथे पण तसं या गावांमध्ये शैक्षणिक क्रांती नसल्यासारखेच होते कारण गावात शिक्षणाचं महत्त्व अजिबात नव्हत कारण येथे हे सांगणारा वातावरण निर्माण करणार कोणी लाभलच नाही.मात्र या गावाला ज्ञानाचा प्रकाश दीपस्तंभ होऊन देण्याचं काम २०१२ पासून विनोद जाधव सर व त्यांचे सहकारी राठोड सर यांनी सुरू केलं म्हटलं तर काहीच अवघ ठरणार नाही . या अगोदर या कदमाची वाडी गावला एकही शिक्षक विद्यार्थ्यांना ज्ञानसागरात घेऊन येण्यासाठी धजला नाही त्यामुळे ना विद्यार्थ्याला गोडी लागली ना पालकाला शिक्षणाची आवड थोडी. शेतात काम करणे जणू हेच आपलं जन्मसिद्ध हाक आहे अशी धारणा झालेली कदमाचीवाडी हे गाव शिक्षणाच्या बाबतीत अतिशय मागास असलेलं. ज्या दिवशी या गावाला विनोद जाधव हा शिक्षक रुपी कोहिनूर हिरा लाभला त्यांनी गावचा अभ्यास केला शैक्षणिक वातावरण बघितलं व हे लहान चिमुकले अतिशय शीघ्र बुद्धीचे फक्त गरज होती त्यांना ज्ञान ज्ञानरूपी प्रकाश देण्याची योग्य मार्ग दाखवण्याचा जाधव सरांनी मनाशी निश्चय केला व विडाच उचलला. पालकांना विश्वासात घेतलं व हळूहळू या चिमुकल्यांना वातावरणामध्ये आणायला सुरुवात केली व थोड्याच महिन्यामध्ये या चिमुकल्यावर असे संस्कार रुजवले वातावरण निर्माण केलं.

# कंधारचा विकास महाविकास आघाडीच करेल : अमित देशमुख

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातून केवळ आणि केवळ कंधार शहरात महाविकास आघाडीने सर्व जातीधर्मातील नव्या जुन्या उमेदवारांशी योग्य समन्वय साधून उमेदवार दिले आहेत. पाच वर्षासाठी शहरांची सूत्र महाविकास आघाडीच्या हाती दिल्यास शहराचा विकास महाविकास आघाडीच करेल असे उदगार माजी. मंत्री अमित देशमुख यांनी जाहीर सभेत केले. तळागाळातील सर्व जातीधर्माच्या तरुणांना उद्योग आणि या शहराचा मूलभूत विकास येथील महाविकास आघाडी शहराला प्रगतीकडे नेईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. या ऐतिहासिक शहराला प्रगतीकडे नेण्याचा आमचा मानस असून अरविंदराव नळगे दादा आणि भोसीकर कुटुंब हे करण्यास कठीबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले तर कुणाच्या भूलथापांना बळी न पडता सर्वच जागा महाविकास आघाडीला द्या असे आवाहन यांनी केले. कंधार शहरातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी कंधार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग सेंटर येथील प्रांगणात आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते.

# रियंका पवारच्या कुटुंबाला १० लाखांचा धनादेश सुपूर्द

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

सोमवार दि. १ डिसेंबर २०२५ मौजे कर्जुनेखारे, ता. नगर येथे घडलेल्या बिबट्याच्या हल्ल्याच्या हृदयद्रावक घटनेनंतर रियंका सुनील पवार (वय ६ वर्षे) हिच्या कुटुंबाला तातडी आर्थिक आधार म्हणून १० लाख रुपयांचा धनादेश आज आमदार मा. काशिनाथ दाते सर यांचे सुपुत्र उद्योजक दिलिप दाते यांच्या हस्ते साजल गायकवाड व रोहिदास गायकवाड यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. या मदतीमुळे दु:खी कुटुंबाला काहीसा दिलासा मिळाला. ही भयावह घटना १२ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७.१० ते ७.२० या वेळेत घडली, जेव्हा बिबट्याने



रियंकाला घराजवळून उचलून नेले. घटना समजताच आमदार काशिनाथ दाते तात्काळ रात्री ११ वाजता घटनास्थळी पोहोचले होते. त्यांनी पीडित कुटुंबाला धीर देत वनविभागाच्या अधिकाऱ्यांना “बिबट्या पकडेपर्यंत गाव सोडायचे नाही” अशा कठोर सूचना दिल्या होत्या आणि शोध मोहीम तत्काळ सुरू केली होती. आज सोमवार, १ डिसेंबर रोजी आर्थिक मदत सुपूर्द करताना उद्योजक दिलीपशेठ दाते यांच्या समवेत माजी उपाध्यक्ष प्रताप पाटील शेळके, अंबादास पाटील शेळके, रशिद सय्यद, कैलास लांडे, भाऊसाहेब महांडुळे, सरपंच प्रभाकर मगर, उपसरपंच रामेश्वर निमसे, बाळासाहेब निमसे, संजू बोरुडे, किरण वाघ, विकास निमसे, योसेफ बोरुडे, जानभाई सय्यद, ग्रामसेवक डेरे मॅडम, वनविभाग अधिकारी अविनाश तेलोरे, गायकवाड सर, धोत्रे सर, ग्रामसेविका पुष्पावती डेरे, कम. तलाठी संजय आडोळे यांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संबंधित घटनेनंतर खारे कर्जुने परिसरात बिबट्याची शोध मोहीम अधिक तीव्र करण्यात आली असून सुरक्षेसाठी विशेष उपाय राबविण्यात येत आहेत.

# सरस्वती विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लुटला एन.डी.ए. परेड पाहण्याचा आनंद



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

एनडीए हे भारतातील भूदल, नौदल व वायुदल प्रशिक्षण केंद्र असून जगातील पहिली त्रिसैनिकी प्रशिक्षण संस्था आहे.एनडीए मध्ये शिक्षणा बरोबरच भौतिक,सामूहिक,नैतिक शिस्तबद्ध सैनिकी प्रशिक्षण दिले जाते.बारावीनंतर प्रवेश परीक्षा देऊन विद्यार्थ्यांची निवड केली जाते.या परीक्षेसाठी दरवर्षी नऊ ते दहा लाख विद्यार्थी सहभागी होत असून त्यापैकीगुणवत्तेवर ४०० ते ५०० विद्यार्थ्यांची निवड केली जाते ३ वर्षांचा कोर्स पूर्ण केल्यावर आर्मी साठी डेहराडून, नेव्ही साठी केरळ व एअर फोर्स साठी हैदराबाद या ठिकाणी प्रशिक्षण दिले जाते. यातूनच पुढे देश सेवेचे व्रत घेतलेले अधिकारी निर्माण होतात. एनडीए खडकवासला येथील कार्यालयाचे उद्घाटन १६ जानेवारी १९५५ रोजी झाले असून या प्रशिक्षण संस्थेतून प्रशिक्षण घेतलेल्या अनेक विद्यार्थ्यां नी राष्ट्र सेवेसाठी मोलाचे योगदान दिले आहे खडक वासला परिसर नैसर्गिक दृष्ट्या खूप योग्य असून भूदल नौदल व वायुदल प्रशिक्षणासाठी उत्तम सुविधा असले ले हे ठिकाण असल्याने विद्यार्थ्यांना उत्तम प्रशिक्षण प्राप्त होते. सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) मुंबई येथील सेवानिवृत्त अधिकारी उदापूर गावचेसुपुत्र नामदेव शिंदे साहेब यांच्या प्रयत्नातून विद्यार्थ्यांना ही मानाची परेड पाहण्यासाठी मोफत पासची व्यवस्था करण्यात आली होती. विद्यालयातील इयत्ता दहावीच्या ५१ विद्यार्थी-विद्यार्थिनी व चार शिक्षक शिक्षिका यांनी ही परेड पाहण्याचा आनंद घेतल्याची माहिती मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांनी दिली.दरवर्षी मे महिन्यात व नोव्हेंबर महिन्यात प्रत्येकी तीन दिवस ही परेड घेतली जाते व त्यातूनच पुढे आर्मी नेव्ही व एअर फोर्स साठी विद्यार्थ्यांची निवड होते.

# निवडणूक काळात सराईत आठ गुन्हेगार हद्दपार

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण संदीप सिंह गिल्ल यांनी जुन्नर तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी वारंवार गुन्हे करणारे सरहित ८ आरोपींना हद्दपार केले आहे . जुन्नर पोलीस स्टेशन येथील सोयाबीन चोरी करणारे टोळी प्रमुख सुनील मोहन काळे रा. तलाखी कुसुर व त्याचे टोळीतील पाच खातेदार यांनी रात्रीची घरफोडी, शेतमालाची चोरी ,टपरी , पत्र्याची चोरी ,वारंवार गैर कृती केले आहे . पोलीस अधिनियम १९५१कलम ५५ प्रमाणे हद्दपार करण्याचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक यांच्याकडे सादर करण्यात आला . यावेळी टोळी प्रमुखासह इतर आरोपी निलेश लक्ष्मण केवळ रा. निमदरी , साईनाथ विलास केवळ, रा. विकासवाडी , रवींद्र गोरक्ष केवळ , रवींद्र गोरक्ष केवळ, राजेंद्र रामदास केवळ , गोरक्ष उर्फ रविराज विजय मोघे यांना १वर्षाकरिता पुणे जिल्हा , पिंपरी चिंचवड ,पुणे शहर, ठाणे जिल्हा, अहिल्यानगर, पारनेर व संगमनेर तालुक्यातून हद्दपार केल्या बाबतचे आदेश दिले आहे .

# योजना शहरातील घरा घरात लाभ देण्यासाठी याच विचाराचे निवडून द्या

**जामखेड तालुका : (समर्थ गांवकरी)**

जामखेड येथे होणार नगर पालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी मुख्य मंत्री फडणवीस जहीर सभेत बोलताना पुढे म्हणाले की. केंद्र सरकारच्या योजना आपले राज्य सरकार प्रभावी पणे अंमलबजावणी करत आहे.. त्याचा लाभ लाखो लोकांना मिळत आहे. उदा प्रधानमंत्री घर कुल... म्हाडा प्रकल्प. सौर ऊर्जा.. आयुष्यमान योजना. घर घरपिणयाचे पाणी. स्वच्छ व सुंदर शहर आदी योजना जामखेड शहरात राबविण्यासाठी आपल्याच विचाराचे लोक निवडून द्या.. ज्याच्या हाताला धरून काम करून घेता येईल. प्रसंगी कान धरून



काम करून घेण्यासाठी भाजप प्रणीत पॅनलचे 25 उमेदवारांना व नगराध्यक्ष पदासाठी सौ. प्रांजल अमित चिंतामणी यांना प्रचंड मतांनी विजयी करावे..

मागील काळात शहरांकडे दुर्लभ झाले. त्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. बेकारी.. पिण्याचे पाणी.. सांडपाणी.. रस्ते. आरोग्य. शिक्षण. महिला सक्षमीकरण. आदी प्रश्न सोडविण्यासाठी आपण एकत्र येऊन काम करू. मा. पंतप्रधान मोदी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक योजना आखल्या आहेत. आमंबलबजावणी चालू आहे. तो विकासाचा रथ पुढे नेण्यासाठी भाजपचे उमेदवार निवडून आले पाहिजे. मतदारांनी दोन तारखेस आपले पवित्र.. बहुमोल मत या उमेदवारांना मतदान करा. विकासाची गंगा पुढे नेण्यासाठी सहकार्य करा.

या प्रसंगी विधान परिषद चे सभापती प्रा. राम शिंदे यांनी जामखेड करांच्या वतीने मुख्यमंत्री यांच्या कडे काही प्रमुख मागण्या मांडल्या..

या मधे शहरातील रस्ते.. भुमीगत सांडपाणी योजना. घरकुल योजना. नगर पालिकेत शेतकऱ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कायद्यात बदल केला पाहिजे. आदी मागण्या बाबत सकारात्मक प्रतिसाद दिला.. मा. शिंदे सर हे हेड मास्तर आहेत.. आम्ही त्यांचे विद्यार्थी आहोत.. कारण ते वरीष्ठ सभागृहाचे सभापती आहेत. आम्हाला आदेश देऊ शकतात.. त्यामुळे या शहरासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल.. राज्य शासनाच्या विविध योजना प्रत्यक्षात लाभ मिळण्यासाठी या उमेदवारांना मतदान करा.

असे नम्र आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले... या प्रसंगी जेष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात यांनीही मनोगत व्यक्त केले. या सभेस. मा.आमदार. सुरेश धस. आमदार. टिळेकर.. जिल्हा अध्यक्ष. भालसिंग. ता. अध्यक्ष. ढवळे.. अजय काशिद. अमित चिंतामणी. झेंडे डॉक्टर. प्रविण चोरडिया.. सोमनाथ राळेभात.. मुरूमकर दादा.. दत्तात्रय वारे जामखेड बाजार समितीचे सभापती शरद कार्ले कर्जत येथील. पै. घुले पाटील. कैलास शेवाळे. तालूका अध्यक्ष भाजप. बाजार समिती सभापती. कर्जत. आदी मान्यवर उपस्थित होते. हाजोरोंचया संख्येने नागरिक उपस्थित होते. सभे सकारात्मक प्रतिसाद मिळाला. वातावरण निर्मिती करण्यासाठी या सभेचा फार मोठा वाटा आहे.

भाजप प्रणीत पॅनल निश्चित पणे बहुमत मिळवील असी खात्री भाजप च्या एका पदाधिकाऱ्याने व्यक्त केली.

# कळंब शाळेत बालआनंद मेळाव्याचे उत्साहात आयोजन !

**कळंब (ता. अकोले) : (समर्थ गांवकरी)**



अकोले तालुक्यातील कळंब जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शनिवार, दि. 29 नोव्हेंबर रोजी बालआनंद मेळाव्याचे रंगतदार आयोजन करण्यात आले. मेळाव्याचे उद्घाटन गावचे सरपंच श्री. उत्तम लांडगे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी वाजतगाजत मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमाला उत्साहपूर्ण सुरुवात दिली.

मेळाव्याचे सूत्रसंचालन मा. श्री. सदा आरोटे सरांनी करताना शाळेत मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी वर्षभर विविध उपक्रम राबवले जात असल्याची माहिती उपस्थितांना दिली.

कार्यक्रमात शाळेचे माजी विद्यार्थी रेवण गायकर, भाऊसाहेब जाधव, प्रसाद जाधव, मालुंजकर सर, पोपटदादा लांडगे यांनी मनोगत व्यक्त करत शाळेच्या उपक्रमांचे कौतुक केले. शाळा डिजिटल करण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा सर्व मान्यवरांनी व्यक्त केली.

बालआनंद मेळाव्याच्या निमित्ताने मा. गटशिक्षण अधिकारी कुमावत साहेब यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. मेळाव्यात 51 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. खाद्यपदार्थ, शेतमाल, मनोरंजक खेळ यांसह विविध प्रकारचे स्टॉल लावण्यात आले होते. या मेळाव्यास सुमारे 150 ग्राहकांनी भेट देत उत्तम प्रतिसाद दिला. मेळाव्यात तब्बल 10,000 रुपयांची आर्थिक उलाढाल झाल्याची माहिती शाळेकडून देण्यात आली.

मेळावा यशस्वी करण्यासाठी फलके सर, सदा आरोटे सर, जाधव सर, शिंदे सर, पानसंबळ मॅडम, आहेर मॅडम तसेच अध्यक्ष बाळू लांडगे व सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.



**अहिल्यानगर :** डॉ. रणजीत सत्रे यांना अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवडणुकीत नगरसेवक पदासाठी राष्ट्रवादी पक्षाच्या माध्यमातून उमेदवारी द्यावी.या मागणीचे पत्र सकल माळी समाजाच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांना देण्यात आले आहे. याप्रसंगी सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले,उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ,सचिव राजेंद्र पडोळे, प्रा.माणिक विधाते, ज्ञानेश्वर रासकर,अर्जुन बोरुडे,कोर कमिटी सदस्य अनिल इवळे,प्रकाश इवळे, जालिंदर बोरुडे,कॅप्टन सुधीर पुंड, विनोद पुंड, रामदास फुले, आनंद पुंड,गणेश कोल्हे, चंद्रकांत पुंड, मच्छिंद्र बनकर, कल्याणी गाडळकर आदी उपस्थित होते. या निवेदनात असे म्हटले आहे की,डॉ. रणजीत सत्रे हे गेल्या २० वर्षापासून वैद्यकिय क्षेत्रात काम करत आहेत.सामाजिक कार्यात डॉ.रणजीत सत्रे यांचे मोठे योगदान आहे.

## थोडक्यात बातम्या...




### मुखेड निवडणूक कालावधी वाढली तरी आमच्यात कोणताच बदल होणार नाही

कंधार **(स. गांवकरी) :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू आहेत. दरम्यान, राज्यातील काही न.पा.निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या असून त्यात मुखेड न.पा. ची निवडणूक पुढे गेली असली तरी त्या निवडणुकीत कोणताच बदल होणार नसल्याचे मत कंधार येथिल पत्रकार परिषदेत आमदार डॉ.तुषार राठोड यांनी सांगितले. मुखेडच्या भाजपला कोणताही धक्का बसणार नाही तर कोणताच बदल होणार नसल्याची प्रतिक्रिया मुखेड/कंधार विधानसभेचे आमदार डॉ.तुषार राठोड यांनी पत्रकार परिषदेत केली. कंधार या ठिकाणच्या निवडणुका होत असून येणाऱ्या दि २ डिसेंबर ला भाजपच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी निवडून द्या असे आवाहन ही त्यांनी केले. यावेळी तालुका अध्यक्ष बालाजी पांडागळे,विजय धोंडगे, चंद्रसेन पाटील,माधव मुसळे,उत्तम चव्हाण,शरद मुंडे, हौसाजी वाघमारे कंधार भाजपाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार गंगाप्रसाद यन्नावार यांच्यासह प्रभागातील १५ उमेदवारांची उपस्थिती होती.

### नगरपंचायतच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जोरदार तयारी

नेवासा **(स. गांवकरी) :** नेवासा येथील नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप–शिवसेना युती आक्रमक प्रचाराची तयारी करत आहे. मात्र दोन दिवसांपूर्वी झालेल्या उमेदवारांच्या प्रचार शुभारंभ सभेतच संघटनातील ढासळलेले नियोजन उघड झाल्याने युतीने स्वतःच दिलेला प्रमुख मुद्दा विरोधकांनी हातोहात उचलला आहे. प्रचाराचा नारळ वाढविण्याचा कार्यक्रम असताना संपूर्ण सभेचे नियोजन विस्कळीत असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. मंडपाची उभारणी वेळेत न होणे, बसण्याची व्यवस्था आणि कार्यक्रमाची दिशाहीनता या सर्वांमुळे उपस्थित नागरिक व कार्यकर्त्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. इतकेच नव्हे तर एका प्रमुख नेत्याने स्वतःच मंचावरून आयोजकांना "नियोजन चांगले करा, अशी स्पष्ट कानउघाडणी केली. यामुळे सभेचे वातावरण बदलून गेले आणि याच क्षणापासून सोशल मीडियावर या घटनेचा मोठ्या प्रमाणात व्हिडीओ क्लिपद्वारे प्रसार होऊ लागल्याने युतीच्या प्रतिमेला धक्का बसला. यावरच विरोधक तुटून पडले आहेत. क्रांतिकारी शेतकरी पक्षाचे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे पदाधिकारी म्हणतात "ज्यांना मंडप नीट उभारता येत नाही, त्यांना शहराचा विकास कसा काय करणार? नेत्यांना सल्ले द्यावे लागावेत इतके संघटन कमकुवत झाले आहे. हीच युतीची खरी क्षमता!" विरोधकांनी युतीच्या ढिसाळ नियोजनाची तुलना त्यांच्या सत्ताकाळातील विकास योजनांशी करत, "दमडीचा कार्यक्रम नीट नाही, मग कोट्यवधींचा विकास प्रकल्प काय उभारणार?" असा अप्रत्यक्ष टोलाही लगावला.

### बिबट्याची दहशत ! गाय-वासरावर हल्ला करून शेळीचा फडशा

अहिल्यानगर **(स. गांवकरी) :** नगर तालुक्यात दररोज बिबट्याकडून पशुधनाच्या शिकारीच्या घटना घडतच आहेत. बिबट्यांचा वावर दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहे. गेल्या रविवारी (दि.३०) पहाटे उदरमल येथे बिबट्याकडून गाय व वासरावर हल्ला करण्यात आला आहे. तर शेळीचा फडशा पाडण्यात आला असल्याची घटना घडली. परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले असून, पिंजरा बसविण्याची मागणी करण्यात येत आहे. उदरमल हे गाव पाथर्डी व नगर तालुक्याच्या सीमेवर येत आहे. दोन्ही तालुक्यांतील वनक्षेत्र गावालगत असल्याने या परिसरात वन्यप्राण्यांचा मुक्त संचार आढळतो. डोंगर रांगांमध्ये यापूर्वी देखील बिबट्यांचा वावर अनेक वेळेस आढळून आला आहे. उदरमल परिसरात वारंवार बिबट्याने दर्शन दिले आहे.

"जागतिक दिव्यांग दिनानिमित्त ३ डिसेंबरला दादर येथे विश्वधर्म अपंग मानव सेवा संघातर्फे

# भव्य स्वयंरोजगार मार्गदर्शन मेळावा; १००० दिव्यांगांना साहित्य वितरण"

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**





संपूर्ण राज्यभरात प्रत्येक वर्षीप्रमाणे यंदाही 3 डिसेंबर रोजी जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा होणार आहे. दिव्यांग बांधवांच्या हक्क, सक्षमीकरण आणि सामाजिक सहभाग वाढवण्यासाठी मागील पंचवीस वर्षांपासून कार्यरत विश्वधर्म अपंग मानव सेवा संघ या संस्थेच्या वतीने या दिवशी भव्य स्वयंरोजगार मार्गदर्शन मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा भव्य सेवा उपक्रम 3 डिसेंबर 2025 रोजी दादर येथील शिवाजी मंदिर नाट्यगृहात दुपारी 3 ते सायं. 6 या वेळेत संपन्न होणार आहे.

कार्यक्रमाचे वैशिष्ट्य : या दिवशी 1000 हून अधिक दिव्यांग बांधवांना त्यांच्या उपयोगी विविध साहित्य, सहाय्यक साधने व रोजगारविषयक माहितीचे वितरण करण्यात येणार आहे.

कार्यक्रमास थोर समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे विशेष उपस्थित राहून कार्यक्रमाला प्रेरणादायी साथ देणार आहेत. विश्वधर्म अपंग मानव सेवा संघाने गेल्या पंधरा वर्षांपासून सामाजिक सेवा, दिव्यांग आणि निराधारांच्या पुनर्वसनासाठी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश दादा भारती यांनी या प्रवासाला मानवतेचे अधिष्ठान देत सेवाव्रताचा वटवृक्ष उभारला आहे.

या कालावधीत, गरजूंना धान्य वाटप, रुग्णांना औषध सहाय्य, दृष्टीबाधितांसाठी चष्मे वितरण, आजारी, अपघाती, दिव्यांगांना सरकारी मदत मिळवून देण्याचे प्रयत्न, दिव्यांगांच्या कलेला सामाजिक व्यासपीठ, विद्यार्थ्यांना अभ्यास साहित्य उपलब्ध करून देणे, बेरोजगार दिव्यांग व महिलांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण आणि मार्गदर्शन असे विविध उपक्रम सातत्याने राबवले जात आहेत. गेल्या आठ महिन्यांत संघाने हजारो निराधारांना मोफत धान्य, औषधे आणि आवश्यक मदत पुरवली आहे. स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्यातही संस्थेने विशेष प्रयत्न केले आहेत. या सर्व उपक्रमांना उदारमतवादी दानशूर मान्यवरांचे सातत्याने सहकार्य लाभत असल्याचे अध्यक्ष प्रकाश भारती यांनी सांगितले. विशेषत: समाजसेवक नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांचे संघाला मिळणारे योगदान अतुलनीय असल्याचे त्यांनी नमूद केले.

या सामाजिक आणि सेवाभावी कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश भारती, खजिनदार सुधीर राणे, ट्रस्टी शशिकांत तोडकर, सिल्वेद्र राजेंद्र तसेच अन्य पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

**स्वयंरोजगार मेळाव्यातील महत्त्वाचे विषय**

लघुउद्योग व लघु व्यवसायाविषयी मार्गदर्शन.
दिव्यांग व महिलांना व्यवसाय कर्जासंबंधी आवश्यक माहिती.
बेरोजगार युवक-युवतींसाठी रोजगार प्रशिक्षण.
स्वयंरोजगाराच्या नव्या संधींची माहिती.
नवीन सदस्य नोंदणी.

## नगर तालुक्यात घरात घुसून अल्पवयीन मुलीशी अश्लिल चाळे

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर तालुक्यातील एका गावात अल्पवयीन मुलीसोबत घरात घुसून गैरवर्तन केल्याचा प्रकार शुक्रवारी (२८ नोव्हेंबर) दुपारी चारच्या सुमारास घडला. याप्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात विनयभंग, पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजेंद्र अण्णासाहेब कुसाळे (वय-५३) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. भावाचा अपघात झाल्याने त्याला भेटण्यासाठी शुक्रवारी फिर्यादी अहिल्यानगर येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात गेल्या होत्या. याच दरम्यान, संशयित आरोपी हा फिर्यादीच्या राहत्या घरी जेवणाची मोकळी प्लेट देण्यासाठी गेला होता. याच संधीचा गैरफायदा घेत त्याने अल्पवयीन मुलीची छेड काढून अश्लिल चाळे केले. सदरची घटना फिर्यादीला समजल्यानंतर त्यांनी संशयित आरोपीला याबाबत विचारणा केली असता, त्याने त्यांना शिवीगाळ करून 'तुम्हाला काय करायचे आहे ते करा, माझे कोणी काही करू शकत नाही', अशी धमकी देत दमदाटी केली.

## वडगाव सावताळ येथे बिबट्याच्या हल्ल्यात तीन शेळ्या ठार

### पिंजरा लावण्याची मागणी; शेतकरी वर्गामध्ये भीतीचे वातावरण



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथील भोबाळवस्ती भागात शनिवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास बिबट्याने धुमाकूळ घातला. रावसाहेब भीमजी भोबाळ यांच्या तीन शेळ्यांना बिबट्याने ठार मारल्या. अचानक हल्ला केल्यामुळे शेतकरी वर्गामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी सचिन गांगुर्डे व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले व त्यांनी पंचनामा केला. व हल्ला झालेल्या शेतकऱ्याला नुकसान भरपाई मिळवून देण्याची ग्वाही दिली.

या घटेमुळे भोबाळवस्ती व परिसरातील शेतकरी वर्गात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिक रात्री घराबाहेर पडण्यासही घाबरत आहेत.

वडगाव सावताळ सोसायटी चेअरमन वनविभाग कमिटीचे अध्यक्ष शिवाजी रोकडे व माजी सरपंच राजेंद्र रोकडे, संदीप व्यवहारे यांनी वनविभागाकडे तात्काळ बिबट्यासाठी पिंजरा लावण्याची मागणी केली आहे.

**पिंजऱ्यांची संख्या कमी; वाढविण्याची गरज**

सध्या बिबट्यांचे हल्ले वाढत असून अनेक दुर्दैवी घटना घडत आहेत मानवी वस्तीत सुद्धा बिबट्याचा वावर वाढला आहे. ग्रामस्थांमध्ये भीती आहे बिबट्यांच्या पिंजऱ्यांची संख्या कमी असल्याने पिंजऱ्यांची संख्या वाढविण्याची मागणी करण्यात येत आहे.

## उद्यापासून महाराष्ट्रातील वाईन शॉप बंद राहणार !

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



राज्यातील तळीरामांसाठी आजच्या घडीची सर्वात मोठे अपडेट समोर आली आहे. उद्यापासून अर्थात दि. १ डिसेंबर २०२५ पासून राज्यात काही दिवस ड्राय डे लागू राहणार आहे. अर्थात राज्यात मद्य विक्री बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नक्कीच या निर्णयाचा तळीरामांना मोठा फटका बसणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार एक डिसेंबर पासून पुढील तीन दिवस राज्यातील मद्यविक्री बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.म्हणजेच ३ डिसेंबर पर्यंत राज्यातील मद्यविक्री बंद राहणार आहे. महत्त्वाची बाब म्हणजे हा निर्णय सर्वच ठिकाणी लागू राहणार नाही. काही ठराविक शहरांमध्ये मद्यविक्री बंद ठेवण्याचा निर्णय झालेला आहे. राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण पूर्णतः ढवळून निघाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पहिल्या टप्प्याच्या निवडणुकांचे बिगुल वाजले आहेत आणि पहिल्या टप्प्यात नगरपंचायत तसेच नगर परिषदेसाठी मतदान होणार आहे.

दोन तारखेला मतदान होईल आणि तीन तारखेला मतमोजणी होणार आहे. दरम्यान मतदानाच्या पार्श्वभूमीवर राज्यात ड्रायडे जाहीर करण्यात आला आहे. मतदानाच्या आदल्या दिवसापासून ते मतमोजणीच्या दिवसापर्यंत ड्राय डे राहणार आहे. नक्कीच या निर्णयाचा मद्यप्रेमींना मोठा फटका बसणार आहे. निवडणूक असलेल्या जिल्ह्यातील संबंधित नगरपरिषदा/ नगरपंचायत निर्वाचन क्षेत्रातील म्हणजेच मतदार संघातील सर्व प्रकारचे मद्य विक्री केंद्र बंद ठेवले जाते. संबंधित मतदार संघातील सर्व देशी/ विदेशी किरकोळ मद्य विक्री व माडी विक्री अनुज्ञप्ती), बार अँड रेस्टॉरंट, वाईन शॉप, बिअर शॉपी हे तीन दिवस बंद राहणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार काही जिल्ह्यांमध्ये संपूर्ण तीन दिवस मद्यविक्री बंद राहणार आहे तर काही जिल्ह्यांमध्ये मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर मद्यविक्री सुरू होणार आहे.

## निवडणुकांकरिता ठाकरे शिवसेनेच्या ४ डिसेंबरला मुलाखती

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

- इच्छुकांनी उपस्थित राहण्याचे जिल्हाप्रमुख दळवी, महानगर प्रमुख काळेंचे आवाहन

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांची जोरदार तयारी सुरू केली आहे. इच्छुक उमेदवार, शिवसैनिकांच्या मुलाखती येत्या गुरुवार दि. ४ डिसेंबर रोजी अहिल्यानगर शहरात उत्साहात पार पडणार आहेत. यावेळी इच्छुकांनी आपल्या समर्थकांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन दक्षिण जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, महानगर प्रमुख किरण काळे यांनी केले आहे. नगरपालिका, नगरपंचायत निवडणुका अंतिम टप्प्यात आहेत. त्यातच आता ठाकरे शिवसेनेने पुढील निवडणुकांसाठी कंबर कसली आहे.

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय**
**ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.काचि/आरटीएस/१३३२/२०२५ इतर अधिकारातील नावे भोगवटादार सदरी घेणेबाबत केस. / २०२५

१. भास्कर दारकु पवार, रा. राजुर, ता. अकोले, जि. अहिल्यानगर ......**अर्जदार**

**विरुध्द** .......१) बबन दारकु पवार (मयत), २) दौपदाबाई काशिनाथ देठे (मयत), ३) शालुबाई मारुती तपासे (मयत), ४) तात्याबा दारकु पवार (मयत), ५) विनायक दारकु पवार (मयत), ६) बाळु अ.पा.क. देवराम, ७) शंकर अ.पा.क. देवराम ........**सामनेवाले**

या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, भास्कर दारकु पवार, रा. राजुर ता. अकोले यांनी मौजे राजुर येथील स.न. ५७/१ चे इतर हक्कातील नावे भोगवटादार सदरी घेणेबाबत दिनांक १५/०५/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदार श्री. भास्कर दारकु पवार रा. राजुर यांनी दि. १५/०५/२०२५ सादर केलेल्या अर्जाबाबत लेखी / तोंडी म्हणणे सादर करणेकामी दिनांक २४/१२/२०२५ रोजी तहसिल कार्यालय अकोले येथे सकाळी ११.०० वाजता सुनावणी ठेवणेत आलेली आहे. आपणाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रासह सदर दिनांकास उपस्थित रहावे. सदर दिनांकास आपण उपस्थित न राहिल्यास याबाबत आपले काहीएक म्हणणे नाही असे समजणेत येऊन गुणवत्तेवर निर्णय देणेत येईल. तसेच सदर प्रकरणात पुढील तारखेबाबत रोजनाम्यात नमुद करणेत येईल. याबाबत पुन्हा कोणताही पत्रव्यवहार करणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २४/११/२०२५ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार अकोले तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले करीता**

# हजारो भाविकांच्या उपस्थितीत भव्य महाआरती व महाप्रसाद

### रांधे येथे भक्तीचा महापूर : श्री स्वामी समर्थ मंदिरात महाआरती आणि महाप्रसाद

**पारनेर तालुका : (समर्थ गांवकरी)**



गुरुवार दिनांक 27 नोव्हेंबर 2025 रोजी रांधे येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात आयोजित महाआरती आणि महाप्रसादाचा कार्यक्रम अत्यंत भक्तिभावाने, शिस्तिमधे आणि आध्यात्मिक उर्जेने संपन्न झाला. प्रत्येक गुरुवारी होत असलेला हा सोहळा आता हजारो भाविकांसाठी श्रद्धेचा आधार आणि आध्यात्मिक शक्तीचा स्रोत बनला आहे.

7.45 ते 8.15 सामूहिक स्वामी नामजप, 8.35 – भव्य व भक्तिसमाधीरूप महाआरती,महाआरतीनंतर स्वामी महती व मार्गदर्शन आणि शेवटी महाप्रसाद सेवा. महाप्रसाद सेवा सेवेकरी बाबा पडवळ, विठ्ठल मावळे, पिनू मावळे, प्रभाकर खैरे, प्रशांत खैरे,अक्षय खैरे,सागर पडवळ,राहुल लाळगे, हरिभाऊ कापसे, देवराज शेंडकर, स्वप्निल मावळे, राहुल बा लाळगे, मनोज लोणकर, यश पोखरकर, अविनाश लाळगे, आकाश लाळगे, दीपक मावळे,डॉ. सुभाष मावळे, कैलास शेटे, ओंकार लाळगे, मोहन कामठे, किसन गायकवाड, संतोष मापारी, गणेश चासकर, विलास चासकर, जालिंदर लाळगे, वैजनाथ पडवळ, विशाल खैरे, राम कामठे, धनंजय लाळगे, रामकृष्ण मावळे, विकास शेळके, पांडुरंग य शेंडकर, संतोष नरसाळे, बाळासाहेब नरसाळे,

तसेच प्रत्येक गुरुवारी 12 ही महिने साई संतोषी एक्वा (अळकुटी) तर्फे मोफत पाणी जार सौजन्य, महालक्ष्मी ॲग्रो, रांधे फाटा यांच्या वतीने 12 महिने दिवा तेल याचप्रमाणे अनेक भाविक सहकार्य करत असताना दिसतात.

महाप्रसाद वाढण्यासाठी अनेक युवा वर्ग आणि महिला या ठिकाणी आवर्जून सेवा करताना दिसून येतात.

**समाजाच्या सर्व स्तरातून प्रतिसाद**

या आध्यात्मिक सोहळ्यात शेतकरी, कष्टकरी, वारकरी, धारकरी, शासकीय अधिकारी, पोलीस व सेवा दलातील कर्मचारी, राजकीय क्षेत्रातील मान्यवर धार्मिक आणि आध्यात्मिक पंडित, युवा वर्ग, तसेच कुटुंबासह येणारे सामान्य भाविक यांचा उपस्थितीचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. साधारणता 4 ते 5 हजार स्वामीभक्त व सेवेकरी उपस्थित होते. या गुरुवारीची महाआरती महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अहिल्यानगर जिल्हा अध्यक्ष दत्ता गाडगेसर आणि कारगिल योद्धा मेजर भिमाजी लामखडे तसेच सर्व महाप्रसाद योगदानातील सेवेकरी यांच्या शुभहस्ते पार पडली.देवस्थानच्या वतीने त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. देवस्थानामध्ये "देशसेवा करणाऱ्यांचा सन्मान" हा महत्त्वाचा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. देशासाठी योगदान देणाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सुंदर आणि स्तुत्य उपक्रम आहे.

महाआरती दरम्यान संपूर्ण परिसरात स्वामींचा जय जय कार आणि "दिगंबरा, दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा" या घोषणांनी वातावरण दणाणून गेले.

दर्शना दरम्यान अनेक भाविकांच्या डोळ्यातून आनंदाश्रू अनावर झाले.

# वनविभागाचा धडाकेबाज शोध मोहीम सुरूच !

- दोन दिवसांच्या पाठपुराव्यानंतरही बिबट्या फरार
- परिसरात दहशतीचे वातावरण




**नायगाव: (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील बरबडा सर्कल अंतर्गत असलेल्या कृष्णूर एमआयडीसी परिसरातील बिबट्या हल्ल्यामुळे निर्माण झालेल्या भीतीच्या पार्श्वभूमीवर वनविभागाने दोन तीन दिवसांपासून घेतलेली शोधमोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. श्रीकांत पुपलवाड या तरुणावर शनिवारी झालेल्या भीषण हल्ल्यानंतर वनकर्मचाऱ्यांनी एमआयडीसी परिसरात दुपार नंतर गस्त, पिंजरे, कॅमेरे, ड्रोन आदीची व्यापक व्यवस्था लावून शोधमोहीम राबविली.

मात्र, सलग प्रयत्नांनंतरही बिबट्या अद्याप हाती लागलेला नाही.

घटनेचा मागोवा घेताना वनरक्षक गजानन कोतलवार यांनी सांगितलेल्या माहितीप्रमाणे, सुरुवातीला हा तडस असावा असा वाटत असल्याने टीमने पिंजरे व कॅमेरे लावून शोध सुरू केला.

एमआयडीसीतील मेधावी पाईप कंपनीच्या कंपाऊंडवर चढून निरीक्षण सुरू असताना केवळ पाच फुटांच्या अंतरावर अचानक बिबट्या समोर दिसला.

"त्याची डरकाळी ऐकताच आम्ही तेथून निघून गेलो. हल्ला झालेल्या तरुणाला त्याने सोडून दिलं हेच मोठं आश्चर्य वाटत होतं. तो जमिनीवर होता त्याच्या पासून आम्ही दहा फूट उंचीवर होतो.

निरीक्षण केले तर तो पिंजऱ्याकडे जाण्याऐवजी तो वेगळ्याच दिशेने निघून गेला," असे कोतलवार म्हणाले.

शनिवारी रात्री सव्वा अकराच्या सुमारास तो ज्या वाटेने आत आला त्याच वाटेने बाहेर निघून गेल्याचे कॅमे-यात टिपले गेले. रात्रभर शेजारील गावांत जाऊन वनकर्मचारी ग्रामस्थांना सतर्क करण्याचे काम पूर्ण पथकाने केले.




**भिवंडी** : पोलिस मित्र संघटना (शाखा भिवंडी) आयोजित संघटनेचा फलक उद्‌घाटन उत्साहात पार पडला. यावेळी संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष संतोष दादा चौधरी, राष्ट्रीय जनसंपर्क प्रमुख गजानन भगत,पोलीस निरीक्षक, वाहतूक (शाखा भिवंडी) ज्ञानेश्वर साबळे, जनकल्याण चॅरीटेबल ट्रस्ट मंगेश यादव, ॲड नाना अय्यर, युवा उद्योगपती विराज साईनाथ पवार, आर.जे.फाऊंडेशन रितेश जाधव, ॲड रितेश टावरे, माजी नगरसेविका लक्ष्मी अशोक पाटील, तसेच अखिल पद्मशाली समाज अध्यक्ष रामकृष्ण पोट्टाबतिनी तर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस वंदन करून करण्यात आली व फलकाचे उद्‌घाटन करण्यात आले.

## थोडक्यात बातम्या...




### बेतवडे ग्रामस्थ मंडळ आयोजित श्री देवी भागवत कथा मोठ्या उत्साहात संपन्न

ठाणे/दिवा (स. गांवकरी) : दिवा शहरातील बेतवडे ग्रामस्थ मंडळ, बेतवडे यांच्या वतीने श्री देवी भागवत कथेचे आयोजन मोठ्या उत्सहात करण्यात आले होते. प्रसंगी ग्रामस्थ व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत धार्मिक वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला. कथेचे प्रवचन ह.भ.प. हर्षला ताई मगर (घोटसई, टिटवाळा) यांनी केले. सोमवार, २४ नोव्हेंबर ते गुरुवार, २७ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत दररोज कथा वाचन तर काल्याचे कीर्तन शुक्रवार २८ नोव्हेंबर २०२५ ह.भ.प. चेतन महाराज म्हात्रे यांच्या उपस्थितीत ह.भ.प. जयेश महाराज भाग्यवंत (आंबेगाव) आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमा दरम्यान देवी चरित्र, भक्तीमार्ग, धर्माचरण व सदाचार याबाबत मनोज्ञ यांचे विवेचन करण्यात आले. भक्तांनी मोठ्या श्रद्धा-भावनेने उपस्थित राहून अध्यात्मिक लाभ घेतला. या कार्यक्रमासाठी हजारो भक्तांनी हजेरी लावून धार्मिक परंपरेला उजाळा दिला. या यशस्वी आयोजना संदर्भात जयदीप मारुती भोईर, श्रीधर वाळक्या पाटील, ह भ. प.अनंता बुवा पाटील, ज्ञानेश्वर पाटील, ह. भ. प. लक्ष्मणबुवा पाटील व इतर ग्रामस्थ यांनी नियोजन केले होते.




### रिपब्लिकन पक्षाला मोठे बळ; अजित एकनाथ भगत पक्षात प्रवेश

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिका हद्दीतील दिवा विभागातील राजकारणाला मोठी कलाटणी देणारी बातमी समोर आली आहे. सामाजिक कार्यकर्ते आणि जनसामान्यांमध्ये लोकप्रिय असलेले अजित एकनाथ भगत यांनी आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (RPI) आठवले गटात अधिकृत प्रवेश केला आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण अजित भगत यांच्या पक्षप्रवेशामुळे दिवा विभागातील आरपीआयच्या (आठवले गट) पक्षाला मोठे बळ मिळाले असून कार्यकर्त्यांमध्ये कमालीचा उत्साह संचारला आहे. दिवा विभागातील नागरिकांशी थेट संपर्क असलेले नेते पक्षात आल्याने आगामी निवडणुकांमध्ये पक्षाची ताकद वाढणार असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. लवकरच दिवा शहरातील अनेक कार्यकर्ते हे अजीत एकनाथ भगत यांचे नेतृत्वाखाली पक्षप्रवेश करणार आहे. दिनेश पाटील व अजित भगत ओबीसी समाजाचा मोठा चेहरा असल्यामुळे नक्कीच रिपब्लिकन पक्षाला यांचा फायदा होणार असल्याचे सौरव आढांगळे यांनी सांगितले.

### ३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिनीच दिव्यांगांचा महाएल्गार

नांदेड (स. गांवकरी) : सकल दिव्यांग संघटना तथा बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीच्या वतीने आपल्या विविध मागण्यांसंदर्भात बुधवार दि ३ डिसेंबर रोजी जागतिक दिव्यांग दिनाच्या अनुषंगाने दिव्यांगांचा महाएल्गार मोर्चा काढण्यात येणार आहे. शासन प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्या दिव्यांगांप्रतीच्या उदासीन धोरणा विरोधात हा आक्रोश मोर्चा असुन स्थानिक स्वराज्य संस्था, नागरी स्वराज्य संस्थांसह शासनाच्या विविध कार्यालयाकडून दिव्यांगांच्या कल्याण व पुनर्वसनासाठी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांची अंमलबजावणी करण्यात येत नसल्यामुळे तसेच जिल्ह्यात दिव्यांग व्यक्ती साठींचे हक्क अधिनियम आरपीडब्ल्यु डी ॲक्ट २०१६ आणि महाराष्ट्र राज्य दिव्यांग धोरण २०१८ ची अद्याप अंमलबजावणी करण्यात आली नसल्यामुळे आणि दिव्यांग शाळा संहिता २०१८ नुसार नांदेड जिल्ह्यातील दिव्यांग शाळा चालत नसल्यामुळे यासह आमदार खासदार यांच्या घरावर, कार्यालयावर अर्धनग्न अवस्थेत आक्रोश मोर्चा काढुन भिक मागो आंदोलन करूनही आमदार खासदार यांनी त्यांच्याकडील दिव्यांगांचा दरवर्षीचा राखीव निधी अद्याप खर्च करण्यात आला नसल्याच्या निषेधार्थ हा महाएल्गार आक्रोश मोर्चा काढण्यात येत असल्याचे सकल दिव्यांग संघटना तथा बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीचे अध्यक्ष राहुल साळवे यांनी आज म्हटले आहे. हा मोर्चा बुधवार दि ३ डिसेंबर रोजी जागतिक दिव्यांग दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून सकाळी १० वाजल्यापासून काढण्यात येणार असून जिल्हा परिषद, समाज कल्याण विभाग, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, महानगरपालिका, नियोजन विभाग, नगरपालिका प्रशासन विभाग,जिल्हाधिकारी कार्यालय यासह संबंधित सर्वच शासकीय अधिकारी,आमदार.खासदार.दिव्यांग शाळेचे संस्था चालक यांच्या कार्यालयात, दालनात करण्यात येणार आहे.

# स्वप्ने पूर्ण करण्यासाठी सातत्य, शिस्त आणि आत्मविश्वास बाळगा - एअर होस्टेस भक्ति बडे

- संविधान दिन मोठ्या उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरा
- एअर इंडियाच्या एअर हॉसटेस भक्ती बडे यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन



**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

शहरालगत असलेल्या शिक्षक कॉलनी येथील जिल्हा परिषद शाळेत संविधान दिन मोठ्या उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुण्या म्हणून एअर इंडियाच्या एअर हॉसटेस भक्ती बडे (फुंदे) उपस्थित होत्या.यावेळी केंद्रप्रमुख दगडू महांडुळे,सेवानिवृत्त शिक्षक प्रमोद भावसार,विस्ताराधिकारी रामनाथ कराड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अंबादास चव्हाण, मुख्याध्यापक बाबा जायभाये, भारत ननवरे, प्रमोद भावसार, अशोक तुपे, भाऊसाहेब पालवे, आकाश वारे, सुनीता जाधव, किशोर चव्हाण, सोनाली बावणे, सोनाली उपाध्ये, अनिता तुपे, गायत्री बडे आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांची मनं जिंकणारे भक्ती बडे यांचे संवादमय मार्गदर्शन

भक्ती बडे यांनी संविधानाचे महत्त्व सांगताना विमानसेवेतील अनुभवांची रंगतदार उजळणी केली. विमानात प्रत्येक प्रवाशाचे सुरक्षा आणि समाधान ही आमची पहिली जबाबदारी असते. संविधानाने आपल्याला दिलेल्या कर्तव्यांची जाणीव ठेवून काम केले तर प्रत्येक क्षेत्रात प्रगती शक्य आहे, असे त्या म्हणाल्या.त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देत सांगितले,मोठी स्वप्ने पाहा आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्य, शिस्त आणि आत्मविश्वास बाळगा. गावातील शाळेतूनही आकाशाला स्पर्श करता येतो, हे मी अनुभवले आहे.मुलांनी त्यांची मुलाखत घेत अनेक उत्सुक प्रश्न विचारले.विमानातील विविध प्रसंग, प्रवाशांशी संवाद, सुरक्षा पद्धती अशा अनेक बाबींवर त्यांनी विद्यार्थ्यांना समजून सांगत संवाद अधिक रंगतदार केला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रभात फेरीने झाली.जनजागृती करणारी घोषवाक्ये मुलांनी दिली.चित्रकला, रांगोळी, नृत्य, गायन—उपक्रमांची रेलचेलचित्रकला, रांगोळी, नृत्य, गायन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.गौळणीवरील नृत्य सादर करतांना विद्यार्थ्यांनी पाहुण्यांसह उपस्थितांचे मन मोहून टाकले.

गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड म्हणाले,संविधान दिन हा फक्त उत्सव नसून आपल्या स्वातंत्र्याची, हक्कांची आणि जबाबदाऱ्या पाळण्याची आठवण आहे. मुलांमध्ये असलेली कला, आत्मविश्वास आणि शिस्तच भारताला पुढे नेईल.

## पोलिस पाटील खंडेराव बकाल यांच्या वाढदिवसा निमित्त साहित्य वाटप

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

राज्यपाल पुरस्कार प्राप्त खंडेराव बकाल पाटील असर्जनकर यांच्या वाढदिवसा निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा असर्जन, येथे शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून सामाजिक उपक्रम राबवुन साध्या पणाने वाढदिवस साजरा करण्यात आला.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी राज्यपाल पुरस्कार प्राप्त तथा सामाजिक क्षेत्रातील अग्रेसर व्यक्तिमत्त्वअसर्जन ता.जि.नांदेड यांच्या वाढदिवसा निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा असर्जन येथे शालेय साहित्य वाटप करण्यात आले, यावेळी राजेश जाभंळे,शिक्षक एम.डी. सुर्यवंशी ,नंदु पाटील वैद्य ऊबाठा तालुका प्रमुख नांदेड, पत्रकार रमेश ठाकूर, निळकंठ वरळे,संजय जाधव, छायाचित्रकार सारंग नेरलकर दिलीप पडघणे,चंद्रकांत वैद्य,केशव ऊदगिरे,दिंगाबर वैद्य,श्रीधर वैद्य,शंकर जाधव, शिवशंकर बकाल,संजय रगडे, सदाशिव मोरे, अंगणवाडी ताई शशीकला गाडे, ज्योती पंडित, यांच्या सह गावकरी व विध्यार्थी उपस्थिती होती. सामाजिक बांधिलकी जोपासत केलेल्या या उपक्रमाचे अनेकांनी कौतुक करून अभिनंदन केले आहे.

## धनगर समाजाला आरक्षणाची आझादी मिळेपर्यंत लढणार - बोऱ्हाडे

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

धनगर समाजाच्या अनुसूचित जमाती (एस.टी.) आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी व्हावी यासाठी आंदोलनाची ज्वाला अधिक तापत चालली आहे. संविधानाच्या क्रमांक ३६ नुसार आरक्षणाचा स्पष्ट हक्क असतानाही, गेल्या अनेक दशकांपासून धनगर समाज शासनाच्या अन्यायकारक वागणुकीमुळे हक्कापासून वंचित आहे. शेकडो आंदोलनांचे इतिहास, उपोषणांतून अर्पण झालेले आरोग्य, हजारो बांधवांवर दाखल गुन्हे.. तरीही सत्ता आणि प्रशासकीय यंत्रणा धनगर समाजाच्या न्याय्य मागण्यांवर अद्यापही मुर्दाडपणे मौन बाळगत आहे.



या अन्यायाविरोधात पेटलेल्या लढ्याला नवी धार देण्यासाठी जालना येथे सलग १६ दिवस उपोषण करत रणशिंग फुंकणारे, धनगर आरक्षण मुक्तिसंग्राम लढ्याचे पुरस्कर्ते दीपकभाऊ बोऱ्हाडे रविवारी ठाण्यात दाखल झाले. जांभळी नाका येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकाला वंदन करून त्यांनी ठाण्यातील समाजबांधवांशी संवाद साधला. स्मारक परिसरात ठाणे शहरभरातून समाजबांधव मोठ्या संख्येने एकत्र जमले होते.

धनगर एस.टी. आरक्षणाची त्वरित अंमलबजावणी करावी यासाठी येत्या २१ जानेवारी २०२६ रोजी मुंबईच्या आझाद मैदानात भव्य आंदोलन होणार आहे. या संदर्भातील नियोजन बैठकीत करण्यात आले. यावेळी धनगर समाजाचे नेते महादेव अर्जुन, शंकर कोळेकर, मल्लिकार्जुन पुजारी, ॲड नानासाहेब मोटे, ॲड प्रकाश पुजारी, निहारिका कोंदले, दीपक देवकाते, राजेंद्र शेळके, राजू जांगळे, धनगर प्रतिष्ठानचे अध्यक्ष दीपक कुरकुंडे, डॉ. अरुण गावडे, दादा पडळकर, महेश गुंड, प्रसाद वारे, राजेश वारे, अविनाश लबडे, संतोष बुधे, सचिन बुधे, अरुण परदेशी, जालिंदर पांढरे, कुमार पळसे, दीपक झाडे, उद्धव गावडे, किरण धायगुडे, सुनील पळसे, संदीप माने, सचिन झोरे, अखिलेश पाल, मधुकर गडदे सर, सौदागर खरात, भीमराव जानकर, नरेश शिरगिरे, प्रमोद वाघमोडे, सुनील राहिंज, अमोल गावडे यांच्यासह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते. धनगर प्रतिष्ठान, ठाणे जिल्हा यांच्या वतीने सदर बैठकीचे नियोजन करण्यात आले होते.

## बंटी लांडगे यांनी स्वखर्चातून निर्माण केलेल्या त्रिपीटक बुध्दविहाराचा उद्‌घाटन सोहळा उत्साहात संपन्न

### सुप्रसिध्द गायक अजय देहाडे यांच्या गायनाच्या कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

शहरातील देगावचाळ भागात युवा नेते बंटी लांडगे यांनी स्वखर्चातून त्रिपीटक बुध्दविहार स्थापन केले असून दि. ३० नोव्हेंबर रोजी बुध्दमुर्ती प्रतिष्ठापणा व बुध्दविहार उद्‌घाटन सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्याचे स्वागताध्यक्ष माजी महापौर प्रतिनिधी विलास धबाले हे होते. या सोहळ्यानिमित्त सुप्रसिध्द गायक काळजावर कोरले नाव फेम अजय देहाडे यांचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

भैयासाहेब आंबेडकरनगर देगावचाळ या भागात मागील अनेक दिवसांपासून बौध्दविहाराच्या कामासाठी बंटी लांडगे यांनी पुढाकार घेतला होता. मागील ३०ते ३५ वर्षापासून हे काम प्रलंबित होते. बंटी लांडगे यांनी स्वखर्चातून या कामास सुरूवात करून काम पूर्णत्वास नेले. काम पूर्ण झाल्यामुळे सदरील कामाचा उद्‌घाटन सोहळा व बुध्दमुर्ती प्रतिष्ठापणा करण्यासाठी बंटी लांडगे यांनी पुढाकार घेत भव्य-दिव्य असा सोहळा दि. ३० नोव्हेंबर रोजी पार पडला. पुज्य भदन्त डॉ.उपगुप्त महाथेरो यांच्या हस्ते बुध्द मुर्तीची प्रतिष्ठापणा व बुध्दविहाराचे उद्‌घाटन पार पडले. शिलरत्न भन्ते व भिक्खू संघाची प्रमुख उपस्थिती होती. खा. रविंद्र चव्हाण, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे जिल्हाध्यक्ष डॉ.सुनील कदम, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, उपमहापौर शिला कदम, सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती कमलबाई लांडगे, उपमहापौर आनंद चव्हाण, दै.लोकपत्रचे आवृत्ती संपादक तथा व्हाईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष डॉ.गणेश जोशी यांची उपस्थिती होती.




प्रारंभी प्रभागामधून भव्य बुध्दमुर्ती रॅली काढण्यात आली. या रॅलीत हजारो बौध्द उपासक, उपासिका यांची हजेरी होती. सायंकाळी महाराष्ट्राचे सुप्रसिध्द गायक अजय देहाडे यांचा भिमगिताचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी त्रिपीटक बुध्दविहार समितीचे चांदू पंडीत, अशोक हिंगोले, भालचंद्र गवाले, दिपक पंडीत, सुदर्शन राजभोज, देवराव गोडबोले, सुरज राजभोज, महेंद्र गोडबोले, विलास कोकरे यांच्यासह बंटी लांडगे मित्रमंडळाने परिश्रम घेतले.

# किनवटमध्ये बीजेपीची जाहीर सभा उत्साहात

- विकासाची गंगा आणण्यासाठी 'कमळ' चिन्हावर मतदानाची आ. केराम यांची भावनिक साद
- नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराचा अंतिम दिवस; दुर्गा मैदानावर भाजपा जाहीर सभा




**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराचा शेवटचा दिवस असल्याने भारतीय जनता पक्षातर्फे दुर्गा मैदान, किनवट येथे भव्य जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले. विविध प्रभागांमधून नागरिकांची उपस्थितीत लाभलेल्या या सभेला आमदार भीमराव केराम, जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, प्रवीण साले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सभेच्या मंचावर गंभीरे, महिला जिल्हाध्यक्ष संध्या राठोड, रघु मामा, धर्मसिंग राठोड, युवा नेते संदेश केराम, तालुका प्रमुख बालाजी मुरकुटे, माजी नगराध्यक्ष ईसा खान, माजी जिल्हा बँक अध्यक्ष दिनकर दहिफळे, बाजार समितीचे सभापती बालाजी मुंडे पाटील, माजी नगराध्यक्ष व्यंकटराव नेम्मानिवार, जिल्हा उपाध्यक्ष संदीप केंद्रे, साजिद खान, वेंकट गोपाळराव नेम्मानिवार, मुसा खान, वैजनाथ करपुडे पाटील आदींसह महायुतीचे सर्व उमेदवारांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा सरचिटणीस प्रा. किशन मिरासे, बाबुराव केंद्रे व बाळकृष्ण कदम यांनी संयुक्तपणे केले.

प्रास्ताविक करताना माजी नगराध्यक्ष साजिद खान यांनी मागील कारभारात झालेल्या विकासकामांचा आढावा घेऊन आगामी कामांच्या दिशेने दृष्टीकोन मांडला.

वैजनाथ करपुडे पाटील : महायुती सरकारच्या कामगिरीचा आढाव्हा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे वरिष्ठ नेते वैजनाथ करपुडे पाटील यांनी महायुती सरकारतर्फे तालुका व शहरात झालेल्या विकासकामांची माहिती देत भविष्यातील योजनांची रूपरेषा मांडली. ईसा खान यांचे आकर्षक भाषण : लोकशाहीत मतदानाची शक्ती समजावून सांगितली. माजी नगराध्यक्ष ईसा खान यांनी आपल्या रंजक शैलीत भाषण करताना लोकशाहीतील मतदानाच्या हक्काची ताकद स्पष्ट केली. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत, शेतीप्रधान देशातील शेतीचे महत्त्व तसेच पशुधन, शिक्षण व पालकांच्या जबाबदारीवर भर दिला. शेवटी महायुतीच्या उमेदवारांना मतदान करण्याचे जोरदार आवाहन केले.

प्रवीण साले : "शहरातही भाजपाचा नगराध्यक्ष हवा" भाजपा नेते प्रवीण साले म्हणाले की, देशाचे व राज्याचे सरकार जात-धर्माच्या पलीकडे जाऊन सर्वांना न्याय देणारे असून महिलांना मोठी जबाबदारी दिली आहे. "विकासाच्या गंगेसाठी मोदी-फडणवीस आणि किनवटसाठी केराम सरकार आवश्यक आहे," असे नमूद करत शहरात भाजपाचा नगराध्यक्ष निवडून देण्याचे आवाहन त्यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# तालुकास्तरीय समूह गीत गायन स्पर्धा संपन्न

**राजूर : (समर्थ गांवकरी)**




राजूर येथील सत्यनिकेतन संस्थेचे गुरुवर्य रा.वि.पाटणकर सर्वोदय विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील कै.सावित्रिबाई मदन कन्या निवासमध्ये कै.बापुसाहेब शेंडे स्मृतीचषक आंतरविद्यालयीन तालुकास्तरीय समुहगीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे उद्‌घाटन सत्यनिकेतन संस्थेचे ज्येष्ठ संचालक मिलिंदशेठ उमराणी यांच्या अध्यक्षतेखाली तसेच संचालक श्रीरामशेठ पन्हाळे,माजी प्राचार्य लहानू पर्बत,मनोहर लेंडे,प्राचार्य भाऊसाहेब बनकर आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाले.या स्पर्धेसाठी तालुक्यातील एकूण 11 संघ सामील झाले होते. या तालुकास्तरीय गीत गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक खिरविरे येथील सर्वोदय विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने मिळविला.गीत गायन प्रसंगी विद्यार्थी यश पराड याची हार्मोनियम वाद्याची साथ मिळाली यास प्रा. योगेश शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

तसेच द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पुरुषवाडी,तृतीय क्रमांक गुरुवर्य रा. वि. पाटणकर सर्वोदय विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राजूर व उत्तेजनार्थ बक्षीस मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूल अकोले यांनी प्राप्त केला.

यावेळी तज्ञ परीक्षक म्हणून श्री. मालवणकर सर, श्री. जंगम सर व श्री. शालिग्राम सर यांनी परीक्षणाचे काम सुव्यवस्थितपणे केले. अनुक्रमे प्रथम, द्वितीय,तृतीय,उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त संघांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे वितरित करण्यात आली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

विद्यालयाचे प्राचार्य भाऊसाहेब बनकर व पर्यवेक्षक गोरक्ष मालुंजकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे प्रास्तावीक व स्वागत प्राचार्य भाऊसाहेब बनकर यांनी केले.तर किशोर देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले.



**नवी मुंबई :** जनसामान्यांचा आवाज प्रभावीपणे मांडणाऱ्या दैनिक समर्थ गांवकरी वृत्तपत्राचे माजी खासदार संजीव नाईक यांनी प्रत्यक्ष वाचन करून कौतुक केले. याप्रसंगी त्यांनी वृत्तपत्रातील निर्भीड लेखनशैली, स्थानिक प्रश्नांवरील भक्कम मांडणी आणि जनतेच्या हितासाठी केलेल्या सतत प्रयत्नांची प्रशंसा केली.

## थोडक्यात बातम्या...



### सेवा गौरव समारंभ : स्वारातीम विद्यापीठातील दोन कर्मचाऱ्यांचा सन्मान

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील दोन मान्यवर कर्मचाऱ्यांचा सेवा गौरव समारंभ सोमवारी, दि. १ डिसेंबर २०२५ रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात उत्साहात पार पडला. भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुलाचे प्राध्यापक डॉ. रमेश नारायणराव ढगे आणि वरिष्ठ ग्रंथालय सहायक गणेश नारायणराव लाठकर हे दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या दीर्घ, समर्पित व उल्लेखनीय सेवेला या समारंभातून भावपूर्ण दाद मिळाली. समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन उपस्थित होते. व्यासपीठावर प्र. कुलसचिव डॉ. एम. के. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, तसेच गणेश लाठकर यांच्यासह वर्षा लाठकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात सर्वप्रथम प्र-कुलगुरू डॉ. महाजन यांनी निवृत्त होणारे गणेश लाठकर यांना सपत्नीक शाल, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र देऊन सन्मानित केले. त्यानंतर स्वारातीम विद्यापीठ पतसंस्थेतर्फे संस्थेचे अध्यक्ष गोविंद हंबर्डे यांनीही शाल व स्मृतिचिन्ह प्रदान करून सहकारी लाठकर यांचा मनःपूर्वक गौरव केला.



### गॅस पाईपलाईनचे रखडलेले काम लवकरच पूर्ण होणार : संजीव नाईक

नवी मुंबई (स. गांवकरी) : कोपरखैरणे विभागातील सर्वसामान्य नागरिकांची प्रतीक्षा अखेर संपण्याच्या मार्गावर आहे. दीर्घकाळ रखडलेले गॅस पाईपलाईनचे काम लवकरात लवकर पूर्ण केले जाणार असल्याचे आश्वासन माजी खासदार संजीव नाईक यांनी दिले आहे. कोपरखैरणे सेक्टर परिसरात झालेल्या नागरिकांच्या भेटीत शंकर मोरे यांसह मोठ्या संख्येने उपस्थित नागरिकांनी या कामातील विलंबाबाबत नाराजी व्यक्त केली. यावर प्रतिक्रिया देताना संजीव नाईक यांनी काम पूर्णत्वास नेण्यासाठी संबंधित यंत्रणांना गती देण्याचे निर्देश दिल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी खास आश्वासन देत सांगितले की, “हे महत्त्वाचे काम आता आणखी रखडणार नाही. नागरिकांची होणारी गैरसोय आम्हाला मान्य नाही. अतिशय लवकर हे काम पूर्ण होईल आणि त्याचा शुभारंभ प्रतीकात्मक रूपात लाइटरच्या माध्यमातून करण्यात येईल.” स्थानिक नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असलेले एलपीजी पाईपलाईनचे काम पूर्ण झाल्यास अनेक घरांना सुरक्षित आणि सुलभ गॅसपुरवठा उपलब्ध होणार आहे. संजीव नाईक यांचे हे आश्वासन स्थानिकांसाठी मोठा दिलासा मानला जात आहे. कामासाठी आवश्यक प्रक्रिया सुरू असून येत्या काही दिवसांत प्रत्यक्ष हालचाल दिसून येईल, अशी माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली आहे.

### सामूहिक आत्महत्येने देवळा हादरले : एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू



देवळा (स. गांवकरी) : नाशिक जिल्ह्यातील देवळा तालुक्यात दि. ३० रोजी एक हृदयद्रावक आणि धक्कादायक घटना घडली. फुले माळवाडी येथे एकाच कुटुंबातील चौघांनी आत्महत्या केल्याची घटना समोर येताच संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे. या घटनेत गोविंद शेवाळे (वय ४१), त्यांची ३५ वर्षीय पत्नी, ८ वर्षीय मुलगी हर्षाली आणि २ वर्षांचा मुलगा शुभम यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. घटनेची माहिती मिळताच देवळा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. गोविंद शेवाळे यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला, तर त्यांची पत्नी व दोन्ही लहान मुलांचे मृतदेह घरातील बेडवर आढळून आले. गोविंद शेवाळे हे होमगार्ड विभागात कार्यरत होते. प्राथमिक पंचनामा करून सर्व मृतदेह पोस्टमार्टमसाठी सरकारी रुग्णालयात पाठवण्यात आले. या घटनेपूर्वी गोविंद शेवाळे यांनी व्हॉट्सअॅपवर भावपूर्ण श्रद्धांजलीचा स्टेटस ठेवला होता. यामुळे संशय येऊन त्यांचा चुलत भाऊ चौकशीसाठी घरी गेला असता ही भयावह घटना उघडकीस आली. दरम्यान, नाशिक विभागीय फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी भेट देऊन तपास केला. घरातील परिस्थिती, वस्तू व संभाव्य पुराव्यांची पाहणी करण्यात आली आहे. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप अस्पष्ट असून आर्थिक तणाव, कौटुंबिक अडचणी किंवा इतर कारणांचा तपास विविध अंगांनी सुरू आहे. या दुर्दैवी घटनेने संपूर्ण देवळा तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक सार्थक नेहते यांच्या मार्गदर्शनाखाली देवळा पोलीस करीत आहेत.

# नगर परिषद निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

- मतदारांनी निर्भिडपणे मतदान करावे – डॉ. शारदा चौंडेकर

**किनवट : (समर्थ गांवकरी)**



नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ मंगळवारी दि २ डिसेंबर रोजी होत असून निवडणूक मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाल्याची माहिती तहसीलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. शारदा चौंडेकर यांनी दिली. मतदानाचा हक्क निर्भिडपणे बजावण्यासाठी प्रत्येक मतदाराने मतदान केंद्रावर सकाळपासून उत्साहाने हजेरी लावावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार सर्व पूर्वतयारी पूर्ण झाली असून किनवट नगर परिषद क्षेत्रातील १० प्रभागांमध्ये अध्यक्ष पदासाठी ८ उमेदवार आणि २१ नगरसेवक पदांसाठी ९२ उमेदवार रिंगणात आहेत. तर शहरातील एकूण मतदारसंख्या २५, ५९३ असून त्यापैकी पुरुष १२, ३३४, स्त्री मतदार १३, २५६ आणि इतर ०३ आहेत.

२९ मतदान केंद्रे – एकही संवेदनशील नाही : शहरात २९ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली असून यापैकी एकही केंद्र संवेदनशील किंवा अतिसंवेदनशील नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी १० क्षेत्रीय अधिकारी नियुक्त करण्यात आले असून त्यापैकी ५ राखीव आहेत.

मतदानासाठी १९९ अधिकारी कर्मचारी : निवडणुकीकरिता एकूण, १४६ मतदान अधिकारी ( ८७ पुरुष, २९ महिला), ५३ राखीव मतदान अधिकारी ( ४४ पुरुष, ९ महिला) तैनात आहेत.

याशिवाय निवडणूक प्रक्रियेतील इतर १५० हून अधिक अधिकारी-कर्मचारी काम पाहत असून १५ वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे.

कडेकोट पोलीस बंदोबस्त : उपविभागीय पोलिस अधिकारी रामकृष्ण मळघणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक गणेश कराड यांच्या नेतृत्वात व्यापक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. या बंदोबस्तात १ उपविभागीय पोलिस अधिकारी, २ पोलिस निरीक्षक, १० पोलिस उपनिरीक्षक, १५० पोलिस अंमलदार, १०० होमगार्ड, RCP ची १ प्लाटून, SRPFच्या २ प्लाटून, असा मजबूत फौजफाटा तैनात आहे.

उत्कृष्ट नियोजनासाठी अधिकारी सज्ज : निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. चौंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली के, मुख्याधिकारी व सहायक निवडणूक अधिकारी विवेक कांदे, नायब तहसीलदार तथा अतिरिक्त सहायक निवडणूक अधिकारी चंद्रशेखर सहारे, नायब तहसीलदार म. रफिक बशीरोद्दीन, नायब तहसीलदार बालाजी फोले, निलेश राठोड, मास्तर ट्रेनर उत्तम कानिंदे व मल्लिकार्जून स्वामी यांच्यासह सर्व विभागांचे कर्मचारी काटेकोर व समन्वयातून निवडणूक प्रक्रिया हाताळत आहेत.

पहिली पथके रवाना : प्रभाग १ मधील मतदान केंद्र क्रमांक १/ १ जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा, नयाकॅम्प आणि १/ २ जवाहरूल उलूम उर्दू हायस्कूल, किनवट येथील मतदान पथकांचे साहित्यांसह स्वागत करून त्यांना मतदान केंद्राकडे रवाना करण्यात आले. यावेळी स्वतः निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. शारदा चौंडेकर उपस्थित होत्या. निवडणूक शांततेत, सुरळीत व पारदर्शक रीतीने पार पडावी यासाठी प्रशासनाकडून सर्व तयारी पूर्ण असून नागरिकांनी आपल्या लोकशाही हक्काचा वापर करीत मोठ्या संख्येने मतदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शालेय विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

**ठाणे,दिवा : (समर्थ गांवकरी)**

मुंब्रा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील दिवा पोलीस चौकी येथे 'पब्लिक स्कूल, दातिवली (दिवा)' या शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन आणि चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये कायद्याची समज वाढावी आणि सुरक्षितते विषयी जागरूकता निर्माण व्हावी या उद्देशाने शाळेचे विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि शिक्षकांना पोलीस चौकीत निमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमात सहायक पोलीस निरीक्षक (API) प्रवीण सुरवाडे यांनी विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनचे कामकाज कसे चालते, याबद्दल सविस्तर माहिती दिली. यावेळी अनेक महत्त्वाच्या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले सायबर क्राईम व ऑनलाईन फ्रॉड, इंटरनेटचा वापर करताना घ्यायची काळजी, गुड टच आणि बॅड टच बद्दल सुरक्षिततेच्या दृष्टीने जागृती, डायल ११२ (Dial 112) आपत्कालीन मदतीसाठी संपर्क कसा करावा, तसेच अमली पदार्थ विरोधी जनजागृती व व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम तसेच कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्नोत्तरांच्या तासात विद्यार्थ्यांच्या मनातील शंकांचे आणि प्रश्नांचे निरसन API श्री. सुरवाडे यांनी केले.

# कंधारचा विकास महाविकास आघाडीच करेल : अमित देशमुख

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



जिल्ह्यातून केवळ आणि केवळ कंधार शहरात महाविकास आघाडीने सर्व जातीधर्मातील नव्या जुन्या उमेदवारांशी योग्य समन्वय साधून उमेदवार दिले आहेत. पाच वर्षासाठी शहरांची सूत्र महाविकास आघाडीच्या हाती दिल्यास शहराचा विकास महाविकास आघाडीच करेल असे उदगार माजी. मंत्री अमित देशमुख यांनी जाहीर सभेत केले.

तळागाळातील सर्व जातीधर्माच्या तरुणांना उद्योग आणि या शहराचा मूलभूत विकास येथील महाविकास आघाडी शहराला प्रगतीकडे नेईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. या ऐतिहासिक शहराला प्रगतीकडे नेण्याचा आमचा मानस असून अरविंदराव नळगे दादा आणि भोसीकर कुटुंब हे करण्यास कठीबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले तर कुणाच्या भूलथापांना बळी न पडता सर्वच जागा महाविकास आघाडीला द्या असे आवाहन यांनी केले.

कंधार शहरातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी कंधार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग सेंटर येथील प्रांगणात आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी माजी आमदार ईश्वरराव भोसीकर,माजी नगराध्यक्ष अरविंदराव नळगे,एकनाथ मोरे, संजय भोसीकर, वंचितचे शिवकुमार नरंगले,उबाटाचे नेते पुरुषोत्तम धोंडगे,अल्पसंख्यकचे मोहम्मद अजीम, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार शहाजी नळगे यांच्यासह 10 प्रभागातील काँग्रेस,शिवसेना,वंचित आघाडीच्या उमेदवारांची उपस्थिती होती.

काँग्रेस तालुका अध्यक्ष संजय भोसीकर यांनी प्रास्ताविक केले. तर कंधार नगरीचे मुलुख मैदानी तोफ म्हणून ओळखले जाणारे अरविंद नळगे यांनी शहर विकासाची थीम मतदारांपुढे ठेवली तर दर पाच वर्षांनी पक्ष बदलणारे आमदार शहराचा विकास कसा करेल हा प्रश्न मतदारांपुढे ठेवला. नगरपालिकेत सर्वच्या सर्व जागा महाविकास आघाडीच्या ताब्यात द्या. अमित देशमुख यांच्या माध्यमातून कंधारचा चेहरा मोहरा बदलल्या शिवाय राहणार नाही.

# हिमालय बेबीकेअरने साजरा केले ‘लव्हड बाय बेबीज’

**(समर्थ गांवकरी)**




हिमालया बेबीकेअरने ‘लव्हड बाय बेबीज’ या आपल्या ओळखीचा उत्सव साजरा करत एक हृदयस्पर्शी आणि खेळकर मोहिम सुरू केली आहे, ज्यामध्ये बाळांना कथानकाच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे.“प्रिसक्राईब बाय डॉक्टर्स ,ट्रस्टेड बाय मॉम्स अँड लव्हड बाय बेबीज” या शीर्षकाखाली साकारलेल्या या मोहिमेत ब्रँडचा मुख्य संदेश अधोरेखित केला आहे बाळांचे प्रेम, आईंचा विश्वास आणि डॉक्टरांची शिफारस हे हिमालया बेबीकेअरचे खरे बळ आहे. विश्वासाच्या या मजबूत पायावर आधारित मोहिमेमध्ये बाळांच्या निरागस परंतु प्रभावी आवाजातून ब्रँडचा काळजी आणि विश्वासाचा संदेश मांडण्यात आला आहे. सर्जनशील सादरीकरणातून, या चित्रपटात बाळांना आवाज देत पालकांच्या भावनांना सुंदर अभिव्यक्ती मिळते ज्यामुळे संपूर्ण कथानक भावनिक आणि प्रतीकात्मक दोन्ही बनते.

ही फिल्म एका काल्पनिक “ऑल इंडिया टायनी टॉक समिट” नंतरच्या पत्रकार परिषदेत घडते, जिथे रिपोर्टर जगातील सर्वात प्रामाणिक मत देणाऱ्या बाळांची मुलाखत घेतात. जेव्हा त्यांना विचारले जाते,“तुमचा आवडता इन्फ्लुएंसर कोण?” तेव्हा एक बाळ गोडपणे म्हणते, “आई!” आई हेच बाळाचे पहिले आणि सर्वाधिक विश्वासू मार्गदर्शक असल्याची आठवण करून देते.

# पाणीबिलावर प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सूट

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

महापालिका कार्यक्षेत्रातील घरगुती वापरासाठी असलेल्या नळसंयोजनाचे थकीत देयक चालू वर्षाच्या मागणीसह एक रकमी भरणा केल्यास प्रशासकीय आकारामध्ये (दंड / व्याज) 100 टक्के सूट लागू करण्यात आली असल्याची माहिती महापालिका आयुक्त तथा प्रशासक सौरभ राव यांनी आज दिली. थकीत पाणीपट्टी बिलावर 100 टक्के इतकी भरीव सवलत जाहिर करण्यात आल्याने नागरिकांना आर्थिक दिलासा मिळणार असून या योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन आयुक्तांनी केले आहे. ठाणे महापालिकेने पाणीपट्टी वसुलीची मोहिम हाती घेतली असून जे नागरिक पाणापट्टी भरणार नाही अशा थकीत बिलधारकांचे नळसंयोजन खंडित करण्याची कारवाई करण्यात येणार आहे, तरी नागरिकांनी पाणीपट्टी भरुन महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त सोरभ राव यांनी केले आहे.

# टोरेंट पॉवरकडून भिवंडी आणि शीळ -मुंब्रा-कलवा येथे भव्य रक्तदान शिबिर

## थॅलेसेमिया रुग्णांसाठी अंदाजे ३६५ रक्ताच्या बाटल्यांचे संकलन

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



समाज आरोग्य आणि कल्याणासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवणाऱ्या टोरेंट पॉवर कंपनीतर्फे शनिवार, 29 नोव्हेंबर रोजी त्यांच्या भिवंडी आणि शील-मुंब्रा-कलवा (SMK) परिसरात मोठ्या प्रमाणावर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कंपनीच्या समुदाय सेवा उपक्रमांचा एक भाग म्हणून घेण्यात आलेल्या या शिबिराचा मुख्य उद्देश थॅलेसेमिया रुग्णांना रक्ताची मदत करणे हा होता. कंपनीच्या सर्व विभागातील कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेतल्यामुळे एका दिवसात ३६५ रक्ताच्या बाटल्यांचे संकलन करण्यात यश आले. संकलित रक्त भागीदार रक्तपेढ्यांना देण्यात आले, ते थॅलेसेमिया तसेच इतर गंभीर रुग्णांच्या उपचारांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

या उपक्रमाला टोरंट पॉवर कर्मचाऱ्यांनी अतिशय उत्साहपूर्ण प्रतिसाद दिला.

अनेकांनी असे सांगितले की अशा सामाजिक उपक्रमात सहभागी होताना त्यांना मनापासून समाधान मिळते आणि नियमितपणे समाजोपयोगी कार्यक्रम राबवणाऱ्या संस्थेचा ते एक भाग असल्याचा त्यांना अभिमान वाटतो.

टोरेंट पॉवरच्या जनसंपर्क अधिकारी यांनी सांगितले, टोरेंट पॉवर ही फक्त विजपुरवठा सेवा देणारी संस्था नाही; आम्ही समाजहितासाठी कार्य करण्यास तितक्याच गांभीर्याने वचनबद्ध आहोत. थॅलेसेमिया रुग्णांसाठी आयोजित या रक्तदान शिबिरात कर्मचाऱ्यांचा प्रचंड सहभाग पाहून आम्हाला अत्यंत आनंद झाला.”

टोरेंट पॉवर वर्षभरात आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि समाजविकासाशी संबंधित विविध उपक्रम राबवत असते.


# बहुराष्ट्रवादाची हार आणि जागतिक संस्थांची थडगी

## संपादकीय



अनेक राष्ट्रांनी एकत्र येऊन उभ्या केलेल्या संघटनांना डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्णायक धक्का दिला, असेच म्हणता येईल. जोहान्सबर्ग येथे झालेल्या 'जी २०' परिषदेच्या सांगतेचीही त्यांनी वाट पाहिली नाही. मियामीत भरणाऱ्या पुढच्या 'जी २०' बैठकीला दक्षिण आफ्रिकेला बोलावले जाणार नाही, असे त्यांनी घोषित केले. जागतिक व्यवहार करू पाहणाऱ्या या संघटनेची रचना किती पोकळ होती, हे ट्रम्प यांनी त्यांच्या साहसी शैलीत उघड केले.

जोहान्सबर्गमध्ये जे घडले त्यातून अनेक राष्ट्रांनी एकत्र येऊन उभ्या केलेल्या संस्था, संघटनांची खरी स्थिती समोर आली. या संघटना दुबळ्या आणि खिळखिळ्या झाल्या आहेत. गेली काही दशके भरत आलेल्या पोकळ शिखर बैठका, नोकरशाहीचा तामझाम आणि सोहळेबाजी यातून बहुराष्ट्रीय संघटनांची रचना दुर्बल झाली. जगभर उफाळून आलेल्या राष्ट्रवादाच्या वजनाखाली या जागतिक संघटना आता गाडल्या जात आहेत. 'जी २०' परिषद आफ्रिकेच्या भूमीवर जोहान्सबर्गमध्ये पहिल्यांदाच भरली होती. जागतिक अर्थकारण आणि राजकारण यात आपले म्हणणे ऐकले जावे, अशी इच्छा बाळगणाऱ्या या खंडाला त्यातून प्रतिकात्मक मान्यता मिळणार होती. दक्षिण आफ्रिकेने अर्थपूर्ण असा काटेकोर कार्यक्रम आखला होता. हवामान संतुलनात न्याय, गरीब देशांसाठी कर्जाची पुनर्रचना, आर्थिक सुधारणा, ऊर्जा संक्रमण आणि आर्थिक समानता असे विषय समोर ठेवण्यात आले होते. मात्र, संपूर्ण शिखर बैठक वॉशिंग्टनने टाकलेला बहिष्कार आणि ट्रम्प यांनी 'मियामीत येऊ नका' असे म्हटल्याने झाकोळली गेली. अशा जागतिक शिखर बैठकांमध्ये अलीकडे दिखाऊपणाच जास्त असतो. परिणाम शून्य. राजकीय उत्सव असावा तशा या बैठका होतात. भाषणबाजी, सांस्कृतिक कार्यक्रम, द्विपक्षीय लगट आणि दिखाऊ वचनबद्धता असा सगळा प्रकार चालतो. नेते येतात; फोटोला उभे राहतात, बोलतात, जेवतात आणि जातात. शेवटी प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या पत्रकात अहोरात्र चाललेल्या वाटाघाटींतून निघालेल्या भरपूर फुगवलेल्या लठ्ठ संज्ञांची भरमार असते. प्रत्यक्षात राबवता येईल, अशा धोरणांचा मात्र लवलेश नसतो.



आंतरराष्ट्रीय पातळीवर जवळपास ६० च्या घरात अशा विविध राष्ट्रांच्या संघटना, संस्था आहेत. निवृत्त झालेले सनदी तसेच राजनैतिक अधिकारी, पराभूत किंवा खालसा झालेले राजकीय नेते, शिक्षण क्षेत्रातील विद्वान आणि इतरांनी एकत्र येऊन या संघटना पोसल्या. आता या रचनाच खिळखिळ्या झाल्या आहेत. जागतिक शांततेचे राखणदार म्हणून स्थापना झालेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेने गेल्या अर्धशतकात कोणताच संघर्ष रोखला नाही वा मिटवला नाही. सुरक्षा परिषद लकवा भरल्यासारखी आहे. इतर संस्थांची स्थितीही फार वेगळी नाही. जागतिक व्यापार संघटनेकडे तंटा मिटवण्याची कोणतीच यंत्रणा नाही. आंतरराष्ट्रीय मजूर संघटना कामगार हक्कांवर परिषदा घेते.

जिथे झालेले ठराव कधीच अमलात येत नाहीत. युनेस्को ठराव करते, वारसास्थळांची घोषणा करते. दुसरीकडे सांस्कृतिक विध्वंस अनिर्बंधपणे चालूच असतो. मानवी हक्क संघटनेत चर्चेची गुऱ्हाळे चालतात. प्रायः ज्या देशांनी मानवी हक्क खुंटीला टांगले आहेत, त्यांच्याकडेच या बैठकांचे अध्यक्षपद असते.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ५२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 8 | 2 | 1 | 4 | 3 | 9 | 7 | 5 |
| 5 | 9 | 4 | 7 | 8 | 2 | 6 | 3 | 1 |
| 7 | 3 | 1 | 6 | 9 | 5 | 2 | 4 | 8 |
| 9 | 4 | 6 | 3 | 5 | 8 | 1 | 2 | 7 |
| 2 | 7 | 3 | 4 | 6 | 1 | 5 | 8 | 9 |
| 8 | 1 | 5 | 2 | 7 | 9 | 3 | 6 | 4 |
| 3 | 2 | 7 | 5 | 1 | 4 | 8 | 9 | 6 |
| 4 | 5 | 9 | 8 | 3 | 6 | 7 | 1 | 2 |
| 1 | 6 | 8 | 9 | 2 | 7 | 4 | 5 | 3 |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ५१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 1 | 2 | 6 | 3 | 4 | 8 | 5 | 7 |
| 6 | 3 | 4 | 8 | 5 | 7 | 9 | 1 | 2 |
| 5 | 8 | 7 | 1 | 2 | 9 | 4 | 3 | 6 |
| 7 | 4 | 5 | 3 | 9 | 2 | 6 | 8 | 1 |
| 1 | 2 | 3 | 4 | 8 | 6 | 7 | 9 | 5 |
| 8 | 6 | 9 | 5 | 7 | 1 | 2 | 4 | 3 |
| 2 | 5 | 6 | 9 | 4 | 3 | 1 | 7 | 8 |
| 3 | 9 | 1 | 7 | 6 | 8 | 5 | 2 | 4 |
| 4 | 7 | 8 | 2 | 1 | 5 | 3 | 6 | 9 |

पंचांग
२ डिसेंबर२०२५
मंगळवार
विक्रम संवत्- २०८२
मार्गशीर्ष शके
संवत्- १९४७

संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान
मास- मार्गशीर्ष
ऋतु- सौर हेमंत
शुक्ल पक्ष
तिथि:द्वादशी १५:५७:२७

नक्षत्र:अश्विनी
२०:५१:२८
योग:वारीयन २१:०८:००
करण:बालव १५:५७:२७
करण:कौलव
२६:१४:३७+

## उपदेशाचे डोस

### मनाची एकाग्रता

पांडुरंग मनाची एकाग्रता कशी करावी ' या विषयाचा अभ्यास करत बसला होता. त्याला जो कोणी भेटावयास येई, त्याच्याकडे तो दुर्लक्ष करायचा. आपल्याच चिंतनात मग्न असायचा. एकदा त्याचे गुरु सहदेव महाराज त्याच्याकडे आले. पाहतात तर पांडुरंग शून्यात नजर लावून बसलेला ! पांडुरंगाचे आपल्या गुरुकडे लक्षही नव्हते. सहदेव महाराज मत्र न रागावता तेथेच थांबले. त्यांनी एक वीट आणली आणि दिवसभर ती वीट एका दगडावर घासत बसले. शेवटी न राहवून पांडुरंगाने महाराजांना विचारले, " महाराज आपण हे काय करता आहात ?" सहदेव म्हणाले, " मला या विटेचा आरसा बनवायचा आहे." पांडुरंग म्हणाला, " महाराज, या विटेला घासून कधी आरसा होईल का ? जीवनभर घासत बसले तरीही विटेचा आरसा होणार नाही." ते ऐकून सहदेव हसले. म्हणाले, " मग तू तरी काय करत आहेस ? वीट जर आरसा होत नसेल, तर मनाचे तरी काय ? मनावरील धूळ जोपर्यंत जात नाही, तोपर्यंत साधना करुन तरी काय उपयोग ?

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६९७- सर खिस्तोफर रेन यांनी पुनर्निर्माण केलेल्या सेंट पॉल कॅथेड्रलचे उद्घाटन. आगीत नष्ट झालेले हे चर्च ३१ वर्षांनी पुन्हा उभे राहिले. ते प्रॉटेस्टंट पंथीयांचे सर्वात मोठे चर्च आहे.
- २००७ - श्रीलंकेचा जादुगार फिरकीपटू मुथैय्या मुरलीधरनने इंग्लंडविरुद्ध पहिल्या कसोटीत दुसऱ्या दिवशी कारकिर्दीतला ७०८ वा बळी घेऊन कसोटी सामन्यात सर्वाधिक बळी घेणाऱ्या ऑस्ट्रेलियाचे फिरकी गोलंदाज शेन वॉर्नच्या जागतिक विक्रमाची बरोबरी साधली.

### राष्ट्रीय

- १९८३- दुसऱ्या महायुद्धापूर्वीचा काळ त्यांनी त्यांच्या अष्टपैलू खेळाने गाजविला होता.
- २००३- लिस्बनच्या न्यायालयाने मोनिका बेदली भारता कडे सोपविणायास मान्याता दिली.
- १९११- ब्रिटिश साम्राज्याचे अधिपती पंचम जॉर्ज व राणी मेरी यांचे बोटीने मुंबईत आगमन. ते मुंबईत जेथे उतरले, तेथे पुढे 'गेट वे ऑफ इंडिया' बांधण्यात आले. त्याचे उद्घाटन १९२४ मध्ये चार डिसेंबर रोजी झाले.

### जन्म

- १८८५- जार्ज रिचर्ड मिनॉ या यकृताचा व यकृत स्रावांचा अभ्यास करणयाऱ्या शस्त्रज्ञांचा जन्म. त्यांना शरीरशास्त्राचे १९३४ चे नोबेल परितोषिक मिळाले.

### निधन

- १९०६- आद्य विज्ञाप्रसारक बाळाजी प्रभाकर मोडक यांचे निधन. त्यांनी २२ पुस्तके लिहिली.
- १९७६- जोशी - अभ्यंकर खून सत्रातील अभ्यंकर कुटूंबीयांची हत्या आदल्या रात्री झाले. या घटनेने पुणे हादरले.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ५२

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | | ४ | ५ | | ६ | ७ | | ८ | ९ | | | ■ |
| ■ | | ■ | | ■ | १० | | ■ | ११ | | ■ | १२ | | ■ | ■ | १३ |
| १४ | | १५ | ■ | १६ | | ■ | १७ | | ■ | १८ | | ■ | १९ | २० | |
| ■ | २१ | | | | ■ | २२ | | | ■ | २३ | | २४ | | | ■ |
| २५ | ■ | | ■ | २६ | २७ | | ■ | २८ | २९ | ■ | ३० | | ■ | ३१ | ३२ |
| ३३ | ३४ | ■ | ३५ | ■ | ३६ | | ३७ | ■ | ३८ | | | ■ | ३९ | ■ | |
| ४० | | ४१ | | ४२ | | ■ | ४३ | ४४ | | ■ | ४५ | ४६ | | ■ | |
| ■ | ■ | | ■ | | ■ | ४७ | | | ■ | ४८ | | | ■ | ४९ | |
| ५० | | | | | ५१ | ■ | ■ | ५२ | | | ■ | ५३ | ५४ | | ■ |
| | ■ | | ■ | ५५ | | ५६ | ■ | | ■ | | ■ | ५७ | | | ■ |
| ५८ | ५९ | | ६० | | ■ | ६१ | ६२ | ■ | ६३ | | | ■ | | ■ | ६४ |
| ■ | | ■ | ६५ | | | ■ | ६६ | | | | ■ | ६७ | | ■ | |
| ■ | ६८ | ६९ | | | ■ | ७० | | ■ | | ■ | ७१ | | ■ | ७२ | |
| ७३ | | | ■ | | ■ | ७४ | | ७५ | ■ | ७६ | | | ■ | | ■ |
| | ■ | ७७ | ७८ | ■ | ७९ | ■ | ८० | | | | ■ | ■ | ■ | ८१ | |
| ८२ | | ■ | ८३ | | | | ■ | | ■ | ८४ | | | | | ■ |

### आडवे शब्द

१. 'सांगत्ये ऐका' या चित्रपटातील गाजलेल्या लावणीची सुरुवात
१०. थंड, शीतल
११. एक मिश्र धातू
१२. चामखीळ
१४. मीलन, भेट
१६. एकटा
१७. चतकोर
१८. मोठा भाऊ
१९. चौघड्याबरोबरचे वाद्य
२१. मार्गक्रमण
२२. दिवाळीतील ऋतू
२६. शहाणा, सूज्ञ
२६. तृण
२८. पुरुष
३०. गुंग, रममाण
३१. समाजातील दबदबा
३६. दहावी रास
३८. फुरसत
४०. आपले राष्ट्रगीत
४३. एका वर्षाचा बारवा भाग
४५. भेदणारे, आरपार जाणारे
४७. नाश
४८. पोट
४९. पावसाची झड
५०. अपत्यांमध्ये असा फरक आता कालबाह्य
५२. गच्च गोळा
५३. वितरण
५५. डोंगराचा तुटलेला भाग
५७. आवक ---
५८. चंद्र
६१. बगीचा
६३. शिकारी
६५. शंकराजवळचे चर्मवाद्य
६६. तीव्र ऊन
६७. सूर्यालाही दिसणे दुर्मिळ ते हा पाहू शकतो अशी म्हण आहे
६८. तरतूद
७०. मला
७१. अटीतटीतील आश्वासन
७२. पद्धत
७३. पांडवांचे चुलत भाऊ
७४. तर्री
७६. वक्र
७७. जिवलग मित्र
८०. तारुण्य
८१. नशीब
८२. नाकीडोळा
८३. सूट
८४. प्रफुल्लित

### उभे शब्द

२. गाजाबाजा
३. खाणाखुणांवरून शोधाशोध
४. हाडांचा पिंजरा
५. भीती
६. हत्तीचे तोंड असलेला, ७. खूप
८. चाणक्यनीती
९. दिवसाचा चोविसावा भाग
१३. माई आणि अक्काची मोठी बहीण
१५. मराठी कडधान्य, हिंदी घागरीत!
१६. अखंड
१७. गावगप्पांची जागा
१८. सेवक
१९. नेहमी
२०. मऊ
२२. शंभर
२४. दुनिया, विश्व
२५. शिकार
२७. उलटी, ओकारी
२९. जीभ, जिव्हा
३२. जादू करणारा
३४. हजार किलो
३५. अट, शर्त
३७. निवांत, रेंगाळत- --- गमत
३९. छिद्र
४१. डौलदार चालीची
४२. टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
४४. कैलासभूमी
४६. द्वार
४८. सोडवून दाखविलेले गणित
४९. बेचव, पाणीदार
५०. माजलेला, उर्मट
५१. गर, मगज
५४. तरतरी
५६. पदार्थ झाकून ठेवण्याचे पात्र
५९. अटीची भाषा
६०. कट्टर व्यक्ती
६२. अक्कल नसलेला गरजू
६३. जाणकार, पारख करणारा
६४. पुन्हा
६७. पांढुरका रंग
६९. एक गळीत धान्य
७०. अभिप्राय
७१. तोपर्यंत (हिंदी)
७२. पद्धत, पायंडा
७३. कौले घातलेले घर
७५. पक्ष्यांचा राजा
७६. खराब
७८. विशेष
७९. राहुटी

उत्तर उद्याच्या अंकात

### शब्दकोडे क्र. ५१ चे उत्तर

आडवे उत्तर : १.धुंद येथ मी स्वैर झोकितो मद्याचे प्याले ९.दीर १०.टाक ११.कुत्रा १२.वायव्य १४.कणीदार १६.रचनाकर १९.राजा २०.थारा २१.हत्या २२.नवार २४.व २५.वानर २७.यच्चयावत ३०.हरामखोर ३२.वडवानल ३३.सटरफटर ३६.महती ३८.कद ४०.मदार ४१.हार ४२.वा ४३.सटवाई ४५.रफ ४६.कप ४९.काल ५०.खारट ५२.लघळपणा ५४.रत्नजडित ५५.नाना ५६.वासा ५८.मळमळणे ५९.सन ६१.पुणे ६२.वेताळ ६४.खरा ६५.कळ ६६.रामराम ६८.पारावार ६९.तपास ७१.मरुत ७३.जननमरण ७४.वाऱ्यावरची वरात

उभे उत्तर : १.धुंदी २.दरवाजा ३.मीन ४.रमणीय ५.तोटा ६.मकर ७.चेतना ८.लोकुरवाळा १३.व्यथा १५.रहस्यमय १७.चलन १८.कान १९.रामायण महाभारत २३.मायावती २५.वारसदार २६.रबर २८.वड २९.तवाना ३०.हलकट ३१.पोरका ३४.टरफल ३५.फटकळ ३७.हर ३९.दवाखाना ४३.सल ४४.ईर ४७.पपनस ४८.सजविणे ४९.कातरवेळ ५१.टवाळ ५३.घटणे ५५.नाताळ ५७.सामदाम ५८.मलम ६०.नवरस ६१.पुरातन ६३.सैरावैरा ६५.कसम ६६.रातवा ६७.राघव ७०.पान ७१.मण ७२.चाची

# सहा दिवसीय ऑनलाइन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम संपन्न

- राष्ट्रनिर्मितीसाठी गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणाची गरज अधोरेखित – प्रा. मनीष मुंदडा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

"डिझाईन थिंकिंग, उद्योजकता आणि इकोसिस्टिम्सद्वारे औद्योगिक नवकल्पनांना चालना" या विषयावर आधारित एआयसीटीई–अटल प्रायोजित सहा दिवसीय ऑनलाइन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे आयोजन साईबालाजी इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्सेस पुणे येथे



२४ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर मध्ये करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि साईबालाजी एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनीष आर. मुंदडा यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सर्वांगीण राष्ट्रनिर्मितीसाठी गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण उपक्रमांची नितांत गरज असल्याचे अधोरेखित केले. विविध क्षेत्रातील प्राध्यापकांच्या अद्ययावत ज्ञानवृद्धीसाठी अशा कार्यक्रमांचे महत्त्व अत्यंत मोलाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, एआयसीटीईच्या देशभरातील कौशल्यविकास उपक्रमांचे कौतुक करताना अटल उपक्रमांतर्गत आयोजित हजारो एफडीपींच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात होत असलेल्या सकारात्मक बदलांबद्दल त्यांनी माननीय पंतप्रधानांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाची प्रशंसा केली.

यावेळी साईबालाजी एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापक सचिव प्रा. निरुपमा मुंदडा यांचा कार्यक्रमात आभासी सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या स्वागतपर भाषणात डॉ. अनामिका सिंग, संचालक,एसबीआयआयएमएस ,यांनी सर्व मान्यवर, तज्ज्ञ व सहभागींचे मनःपूर्वक स्वागत केले. या एफडीपीच्या संकल्पनेपासून त्याच्या यशस्वी अंमलबजावणीपर्यंत सातत्यपूर्ण मार्गदर्शन व पाठिंबा दिल्याबद्दल त्यांनी संस्थेचे अध्यक्ष प्रा. मनीष मुंदडा यांचे विशेष आभार मानले.



नांदेड जिल्हा : मराठवाडा विद्यापीठामध्ये २७ वा महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव - २०२५ दि.४ ते ८ डिसेंबर, २०२५ या दरम्यान संपन्न होत आहे. या भव्य क्रीडा महोत्सवाच्या निमित्ताने दि.३० नोव्हेंबर, २०२५ ते दि. ३ डिसेंबर, २०२५ या कालावधीत विद्यापीठ परीक्षेतील नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये 'क्रीडा ज्योत मशाल रॅली' आयोजित करण्यात आली आहे. या रॅलीचे उद्घाटन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते विद्यापीठ परिसरात करण्यात आले. त्यांनी क्रीडा ज्योत प्रज्वलित करताना विद्यार्थ्यांना क्रीडेद्वारे एकता, शिस्त आणि राष्ट्रीय बांधिलकी जोपासण्याचे आवाहन करत प्रबोधनपर मार्गदर्शन दिले.

## थोडक्यात बातम्या...



### भव्य हेल्थ चेक-अप शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

नवी मुंबई (स. गांवकरी) : कोपरखैरणे सेक्टर 5 येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) वार्ड क्रमांक 46 मधील श्री विठ्ठल किसन मोरे जनसंपर्क कार्यालयात भव्य दिव्य हेल्थ चेक-अप शिबिराचे आयोजन करण्यात आले. सेक्टर 5 मधील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला व कार्यक्रमाची शोभा वाढवली. या शिबिराचे आयोजन मुख्य केअर हेल्थ इन्शुरन्सचे टेकावडे संतोष रामदास यांनी उत्कृष्ट पद्धतीने केले. आरोग्य तपासणीसाठी अपोलो हॉस्पिटलचे स्टाफ, डॉक्टर अतहर खान आणि कर्मचारी वर्गाची विशेष उपस्थिती होती. या प्रसंगी विठ्ठल मोरे, जितेश मोरे, तेजस, दादासाहेब जगताप, राम सिंग, अनवर, टेकावडे संतोष आदी मान्यवरांनी भेट देऊन शिबिराचे कौतुक केले. नागरिकांच्या आरोग्य-जागृतीसाठी असे उपक्रम नियमितपणे आयोजित करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

### शिवनेरीवर 'नमो पर्यटन माहिती केंद्र' उभारणीला सुरुवात



- छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम, लढाया,ऐतिहासिक किल्ले, गडांचे अनुभवता येणार!

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : राज्यातील पर्यटनाला नवी गती देण्यासाठी सरकारकडून ऐतिहासिक किल्ल्यांवर 'नमो पर्यटन माहिती सुविधा केंद्रे'उभारण्याची योजना राबवलीजात आहे.पहिल्या टप्प्यात शिवनेरीसह रायगड,प्रतापगड आणि साल्हेर या चार किल्ल्यांवर अशी केंद्रे उभारली जाणार असून,प्रतापगड आणि शिवनेरी किल्ल्यांसाठी निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे. उर्वरित रायगडआणि साल्हेरसाठी पुढील दोन दिवसांत निविदा काढण्यात येणार आहे, अशी माहिती पर्यटन विभागाचे संचालक भगवंतराव एन.पाटील यांनी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी राज्यभर ७५ 'नमो पर्यटन माहिती केंद्रे' उभारण्याची घोषणा केली होती. ही केंद्रे पूर्णपणे पर्यटन सहाय्य केंद्र म्हणून कार्यरत राहतील.तसेच किल्ल्यांवर व गडांवर जाणाऱ्या वाटा, परिसरातील सुविधा आणि माहितीफलक या सर्वांची आखणी या केंद्रांच्या माध्यमातून केली जाणार आहे. पर्यटकांचा प्रवास यामुळे अधिक सोयीस्कर व आनंदि होण्यास मदत होईल.शिवाय,राज्यातील ऐतिहासिक परंपरा,किल्ल्यांची गौरवशाली वारसा परंपरा आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या संघर्षाचे वारसे नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी ही केंद्रे महत्त्वाची ठरणार आहेत.स्थानिकांच्या माध्यमातून ही केंद्रे चालवली जातील,असेही पाटील यांनी सांगितले. त्यातील पहिल्या टप्प्यात या चार किल्ल्यांसाठी तब्बल ५० कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.या केंद्रांमधून पर्यटकांना किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व,तत्कालीन युद्धकाळातील रणनीती,लढाया व छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अनुभवता येईल,असेही पाटील यांनी सांगितले.ही केंद्रे उभारणीच्या पहिल्या टप्यात पर्यटकांना ऐतिहासिक स्थळांपर्यंत आराम दायी पद्धतीने पोहोचण्यासाठी मार्गदर्शन,सुविधा आणि माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे.




### महिलांसाठी शिक्षणाचे द्वार खुले करणारे खरे समाजसुधारक म्हणजे महात्मा फुले

देवळा (स. गांवकरी) : महात्मा ज्योतिराव फुले हे केवळ भाषण करणारे सुधारक नव्हते, तर प्रत्यक्ष कृतीतून सामाजिक परिवर्तन घडवून आणणारे युगपुरुष होते. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी त्यांनी आयुष्य झोकून दिले. शेतकरी, कष्टकरी, दलित, महिला आणि उपेक्षित घटकांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात त्यांनी निर्भीडपणे लढा दिला. शिक्षण हे सर्वांगीण सामाजिक सुधारणेचे प्रवेशद्वार आहे, ही त्यांची ठाम धारणा होती आणि हे द्वार त्यांनी शूद्र-अतिशूद्र समजल्या जाणाऱ्या महिलांसाठी खुले करून दिले, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. आर. पी. भामरे यांनी केले. ते पुढे म्हणाले की, महात्मा फुले यांनी सनातनी विचारसरणीला आव्हान देत सामाजिक समतेचा विचार समाजात रुजवला. सत्यशोधक समाजाची स्थापना, स्त्री शिक्षणाचा पुरस्कार, बालविवाह, विधवाव्रत, जातिभेद यांसारख्या प्रथांविरोधातील त्यांची चळवळ आजही प्रेरणादायी आहे. त्यांनी मानवतेचे पुजारी म्हणून संपूर्ण आयुष्य समाजासाठी अर्पण केले, त्यामुळेच महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात त्यांचे स्थान अढळ आहे.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संघाने रचला इतिहास !

- सेंट्रल झोन युवक महोत्सवात ११ पारितोषिकांसह सर्वसाधारण तृतीय विजेतेपद
- नाट्य विभागात – जनरल चॅम्पियनशिप व नृत्य विभागाची द्वितीय जनरल चॅम्पियनशिप प्राप्त

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

छत्रपती संभाजी नगर येथील एमजीएम विद्यापीठमध्ये असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी दिल्ली द्वारे आयोजित, ३९ व्या आंतर विद्यापीठ सेंट्रल झोन युवक महोत्सवात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संघाने इतिहासात प्रथमच सर्वसाधारण तृतीय विजेतेपद पटकावून अभूतपूर्व यश संपादन केले.



महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे २५ ते २९ नोव्हेंबर दरम्यान संपन्न झालेल्या या युवक महोत्सवात महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड अशा तीन राज्यातील विद्यापीठांचा सहभाग होता. यात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने एकूण ११ पारितोषिके मिळवून आपला दबदबा निर्माण केला.

नांदेड येथून २४ नोव्हेंबर रोजी 'स्वारातीम' विद्यापीठाचा संघ कुलगुरू डॉ. मनोहर चासकर आणि प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली व विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे यांच्या नेतृत्वात छत्रपती संभाजीनगरकडे रवाना झाला.

विद्यार्थी कलावंत, प्रशिक्षक व व्यवस्थापक असा ६० जणांचा संघ साहित्य, नाट्य, संगीत, नृत्य व ललित कला अशा विविध प्रकारांत सहभाग नोंदवून युवक महोत्सवात ऐतिहासिक यश संपादन करून परतला.

यामध्ये आदिवासी दंडार नृत्यामध्ये लखन कनाके, प्रथमेश तोडसाम, संकेत जुगनाके, पीयूष तोडसाम, संदीप कोडापे, शुभम कोडापे, शिवम सुतार, सुनील खलुले, पुरुषोत्तम आत्राम, रितेश मडावी या विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य सादर केले. लोकसंगीत या कलाप्रकारात अनंत खलुले, ऋषिकेश पांचाळ, गणेश कदम, मंगेश भालेराव, धीरजकुमार प्रधान, श्रीनिवास लंकावाढ, उदय जाधव, वैभव कदम, वैभव शेळके यांनी सर्व द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीने पहिल्यांदाच सुरू केलेल्या संकल्पना नृत्य या स्पर्धेमध्ये विद्यापीठाने द्वितीय क्रमांक प्राप्त करून इतिहास रचला यामध्ये प्रज्योत कांबळे, रामेश्वर आढाव, शिवम सुतार, सुनील खलुले, उदय जाधव, वैभव कदम, स्वाती खंदारे, श्रेयस कुलकर्णी, आदिती केंद्र, अंजली जाधव, आर्यन गिरवळकर, गजानन मिश्रा यांनी बाजी मारली. विडंबन मध्ये श्रेयस कुलकर्णी, आदिती केंद्रे, रामेश्वर आढाव, स्वाती खंदारे व आर्यन गिरवलकर यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. मुकाभिनय मध्ये अंजली जाधव, रामेश्वर आढाव, स्वाती खंदारे, शिवम सुतार, सुनील खलुले व प्रज्योत कांबळे यांनी द्वितीय क्रमांक मिळवला.

शास्त्रीय सुरवाद्य या स्पर्धेत चिन्मय मठपती याने प्रथम क्रमांक पटकावला.

## बिबट्यांचे पशुधनावर होणारे हल्ले वनविभागापुढे आव्हान

**संगमनेर खुर्द : (समर्थ गांवकरी)**

दिवसेंदिवस ग्रामीण व शहरी भागासह बिबट प्रश्न खूप गंभीर होत चालला झाला आहे. अलीकडील मानवी वस्ती नजीक होणारे वाढते हल्ले रोखण्याचे वन विभागापुढे आव्हान निर्माण झाले आहे. त्यात बिबट हा प्राणी वन्यजीव अधिनियम 1972 नूसार वर्गवारी मध्ये क्रमांक 1 मध्ये सामील असल्यामुळे फ्रंट लेवल कर्मचारी वनरक्षक, वनपाल यांच्याकडे बिबट प्रश्न हाताळण्यासाठी कायद्याने कुठलीही शक्ती दिलेली नाही. पिंजरा लावण सुद्धा या कर्मचाऱ्यांच्या हातात नाही.

वाढता मानव वन्यजीव संघर्ष याविषयी मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली पाहिजे व तसेच वन्य प्राणी जनगणना करून पकडलेल्या बिबट्याला जी पी एस ट्रॅक लावून परत त्यांच्या अधिवासात सोडले पाहिजे. त्यामुळे नेमकी बिबट्याची संख्या किती हे समजून येईल व त्यावर नियंत्रण करणे सुलभ जाईल. वनविभाग ९७० गावे हे 'बिबट्याप्रवण क्षेत्र' म्हूणन घोषित करण्यात आले असून

मानव-बिबट संघर्ष रोखण्यासाठी प्रशासन कायम सज्ज असते .

## दि २० डिसेंबर रोजी मतदान तर २१ डिसेबर रोजी मतमोजणी

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

नामनिर्देशन पत्राची छाननी झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निर्णया विरोधातकाही उमेदवारांनी जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले होते त्यामुळे निवडणूक पुढे ढकलण्यात आले आहेत राज्यातील ज्या नगरपरिषदेवर न्यायालयीन अपील दाखल झालेल्या आहे अशा नगरपरिषदा आणि नगरपंचायती मधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने पुढील प्रमाणे जाहीर केला आहे त्यानुसार नांदेड जिल्ह्यातील मुखेड आणि धर्माबाद येथील सर्व निवडणुका होतील




तसेच भोकर . लोहा . व कुंडलवाडी या तीन नगरपालिकेतील तीन प्रभागांमध्ये पण या निवडणुका न्यायालयाच्या आदेशानुसार पुढे ढकलण्यात आले आहेत म्हणजे नांदेड जिल्ह्यातील अपील दाखल झालेल्या नगरपरिषदासाठी राज्य निवडणूक आयोगाचे नविन आदेशानुसार दि २० डिसेंबर रोजी मतदान होणार तर दि २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे . राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या नवीन आदेशानुसार नांदेड जिल्ह्यातील मुखेड व धर्माबाद नगरपरिषदेच्या अध्यक्ष पदाकरीता अपील करण्यात आली होती त्यामुळे तेथील संपूर्ण निवडणूक दि २ डिसेंबर एवजी २० डिसेंबर रोजी होईल त्यामध्ये भोकर नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक १ ब तसेच कुंडलवाडी नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ३ अ व लोहा नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ५ ब चा समावेश करण्यात आला आहे . मुखेड व धर्माबाद येथील निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया नव्याने होणार आहे त्यानुसार जिल्हाधिकारी हे दि ४ डिसेंबर रोजी निवडणूक कार्यक्रम घोषित करतील १० डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजे पर्यंत नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचा अंतिम मुदत राहील तर दिनांक ११ डिसेंबर रोजी निवडणूक चिन्ह नेमून दिले जातील.

## किनवट नगरपरिषद : ईव्हीएम मिशनिंग प्रक्रिया पारदर्शकतेने पूर्ण

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

दि. ३० नोव्हेंबर रोजी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०१५ च्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा असलेल्या ईव्हीएम कमिशनिंगची कार्यवाही दि ३० नोव्हेंबर रोजी अत्यंत पारदर्शक आणि शांततेत पार पडली. राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार दि. २ डिसेंबर २०२५ रोजी होणाऱ्या मतदानासाठी आवश्यक असलेली सर्व मतदान यंत्रे (EVMs) तयार करण्यात आली. या प्रक्रियेला मा. निवडणूक निरीक्षक अनिल



माचेवाड (उपजिल्हाधिकारी) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तर निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती शारदा चोंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक मतदान केंद्रासाठी तसेच राखीव यंत्रांसाठी EVM कमिशनिंग करण्यात आले. नगरपरिषद कार्यालयात उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी आणि विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत मतदानयंत्रांची तपासणी, सीलिंग आणि स्ट्रॉंग रूममध्ये सुरक्षित साठवणूक करण्यात आली. प्रभागनिहाय मतदान केंद्रांसाठी नियुक्त प्रत्येक EVMवर उमेदवार आणि प्रतिनिधींनी मॉक पोल करून मशीनची अचूकता तपासली. यावेळी उपस्थितांनी विचारलेल्या शंका आणि प्रश्नांचे समाधान सीलिंगसाठी नियुक्त अधिकाऱ्यांनी तत्परतेने केले. प्रक्रिया कोणत्याही गोंधळाविना शांततेत पार पडली.

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निवडणूक अधिकारी विवेक कांदे, अतिरिक्त निवडणूक अधिकारी चंद्रशेखर सहारे, नायब तहसीलदार म. रफिक म. बशीरोद्दीन, नायब तहसीलदार बालाजी फोले, मास्टर ट्रेनर स्वामी सर, कानिंदे सर यांनी नियोजनबद्ध पद्धतीने संपूर्ण प्रक्रिया सुरळीत पार पाडली. दरम्यान, मतदानासाठी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० या वेळेत प्रत्येक पात्र मतदाराने निर्भयपणे मतदान करून लोकशाहीचा उत्सव साजरा करावा, असे आवाहन निवडणूक प्राधिकरणांनी केले आहे.

## पेमगिरीतील दत्त मंदिरात हरीनाम सप्ताहाचे आयोजन...!

**संगमनेर खुर्द : (समर्थ गांवकरी)**


स्वराज्याची संकल्पभूमी म्हणून ओळख असलेल्या, पेमगिरीतील दत्त मंदिरात दि.1 ते 8 डिसेंबर या कालावधीत अखंड हरीनाम सप्ताह संपन्न होत आहे.वै.अच्छानंद बाबा ब्रह्मचारी यांच्या आशीर्वादाने, गुरुवर्य ह.भ.प.मनोहर महाराज भोर यांच्या मार्गदर्शनाखाली व ह.भ.प.हौशीराम महाराज कोल्हे यांच्या सूत्रसंचालनाखाली हा सप्ताह सुरु असून यावर्षी हा सप्ताह 45 व्या वर्षात पदार्पण करत आहे. त्यानिमित्ताने महाराष्ट्रातील प्रतिभासंपन्न कीर्तनकारांची कीर्तनसेवा आयोजित केली आहे. गुरुवार दिनांक 4 डिसेंबर रोजी सायं. 6 वाजता भगवान दत्तात्रयांचा जन्मोत्सव सोहळा याची देही याची डोळा बघावा असा भव्य दिव्य स्वरूपात साजरा करण्यात येणार आहे.गीता जयंती, दत्त जयंती तसेच वै.अच्छानंद बाबा बह्मचारी असा त्रिवेणी संगम या त्रिगुणात्मक भगवान दत्त महाराज यांच्या सप्ताहाचा विशेष महिमा आहे.

# हदगाव तालुक्यात प्रथमच बिरसा मुंडा जयंतीनिमित्त भव्य पुतळा शोभायात्रा

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

आदिवासी क्रांतिकारक, जननायक, महामानव व क्रांतीपुरुष बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त हदगाव तालुक्यातील तामसा येथे प्रथमच भव्य पुतळ्याची शोभायात्रा आयोजित करण्यात आली होती. ही ऐतिहासिक शोभायात्रा दि. २९ नोव्हेंबर शनिवार रोजी तामसा ते हदगाव या मार्गावर भव्य दिमाखात निघाली.

तालुक्यातील आदिवासी बांधवांच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक चेतनेला जागृत करणारा हा उपक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे ठळक आकर्षण म्हणून आंध आदिवासी दंडारने नृत्य होते.



मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे शोभायात्रा तामसा शहरातून सुरू झाली.

कार्यक्रमाला विविध सामाजिक संघटना, समाजसेवक, सरपंच, कार्यकर्ते, युवक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात विविध समित्या, युवक मंडळे, ग्रामस्थ, स्थानिक नेतृत्व, सामाजिक संघटना आणि आदिवासी बांधवांचे मोलाचे योगदान असून या उपक्रमाला सर्व स्तरांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

तामसा व परिसरातील आदिवासी समाजात या कार्यक्रमाबद्दल प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे.

कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून डॉ. संजय मुरमुरे, अध्यक्ष पांडुरंग भुरके सर होते. तर प्रकाश टारफे, बोडके ज्ञानेश्वर, राजू भिसे, ज्ञानेश्वर भिसे, मारोती खोकले, शिवाजी खोकले, गजानन वानोळे, बबन खोकले, किरण मुरमुरे, सुजल धुमाळे, मारोती मेटकर, नामदेव भिसे, ब्रह्मजी नाव्हेकर आदी नियोजन समितीत होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिवाजी मुरमुरे, , भुसारे सर, भिसे सर, प्रा. बळीराम मेटकर, दिगंबर गायकवाड, मा. उपसभापती शंकर मेंडके, भाजप नेते डॉ. दीपक नाईक, डॉ. माधव भुरके, पेंथर संघटना युवा नेता धनराज सोनटक्के, डॉ. रामदास डवरे,शंकर भिसे, विठ्ठल,शिक्षक माधव भिसे धुमाळे, संतोष डवरे, माधव भिसे सर डॉ.वावधाने, ग्रामपंचायत अधिकारी कैलास धनवे, मेटकर सर आदींनी परिश्रम घेतले.

# पारनेर केंद्राचा पुणे येथील 'जगदंबा भवन' येथे अभ्यास दौरा संपन्न

**पारनेर: (समर्थ गांवकरी)**

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, पारनेर केंद्राच्या ४१ सहपरिवार साधकांनी नुकताच पुणे येथील जगप्रसिद्ध आध्यात्मिक केंद्र 'जगदंबा भवन' येथे एक महत्त्वपूर्ण अभ्यास दौरा आयोजित केला होता. केंद्राच्या संचालिका साधना दिदी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली हा दौरा यशस्वीरित्या पार पडला,




ज्यामध्ये पारनेरमधील अनेक साधक सहभागी झाले होते. या अभ्यास दौऱ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे ब्रह्माकुमारी परिवारातील ज्येष्ठ सदस्य दशरथ भाई यांचे साधकांना लाभलेले अनमोल मार्गदर्शन. ज्यांनी स्वतः प्रजापिता ब्रह्मा बाबांचे पालना पोषण निर्देश अनुभवले आहे, अशा दशरथ भाई यांनी साधकांना आध्यात्मिक आणि ईश्वरीय ज्ञाना विषयी सखोल माहिती दिली. त्यांनी सहज आणि सोप्या भाषेत ईश्वरीय ज्ञानाचे महत्त्व समजावून सांगितले, ज्यामुळे उपस्थित साधकांच्या मनात नवचैतन्य निर्माण झाले.

यावेळी दशरथ भाई यांनी पुणे येथील जगदंबा भवन या आध्यात्मिक केंद्राच्या कार्याची सखोल माहिती साधकांना दिली. ब्रह्माकुमारीज संस्था केवळ अध्यात्मिक ज्ञानच नाही, तर समाजसेवा आणि नैतिक मूल्यांच्या स्थापनेसाठी कशा प्रकारे कार्यरत आहे, हे त्यांनी विशद केले. हे भवन संस्थेच्या महत्त्वाच्या कार्याचे आणि विश्व परिवर्तनाच्या ध्येयाचे एक प्रेरणास्थान आहे.साधना दिदी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या अभ्यास दौऱ्यामुळे साधकांना ब्रह्माकुमारीज संस्थेच्या मूळ कार्याची आणि तत्वांची जवळून माहिती मिळाली. दशरथ भाई यांच्या प्रेरणादायक शब्दांमुळे साधकांमध्ये सकारात्मक ऊर्जा आणि आत्मिक शांती ची भावना वाढीस लागली. या दौऱ्यामुळे साधकांना आपल्या आध्यात्मिक प्रवासात पुरुषार्थ करण्याची आणि दृढनिश्चयाने पुढे जाण्याची प्रेरणा मिळाली आहे.




रावेर (स गांवकरी) : जळाव जिल्ह्याच्या पुर्वा भागात थंडीचे प्रमाण वाढल्याने रब्बीच्या पिकांमधील अंतर मशागतीच्या कामांना वेग आला आहे . राज्यभरात थंडीचा जोर वाढत असला तरी मध्ये प्रदेश व महाराष्टाच्य सिमेलगत असलेल्या जळगाव जिल्ह्यातील रावेर , मुक्ताई नगर , यावल , तालुक्यातील तपमानाचा पारा १० अंशावर स्थिरावल्याने याचा रब्बीच् या पिकांना उत्पादनात मोठा फायदा होणार असल्याचे बोलले जात आहे.

## थोडक्यात बातम्या...



### 'कीर्तनाची पर्वणी' ; विद्यार्थ्यांमध्ये संस्कार आणि सदगुणांची पेरणी!

पारनेर (स. गांवकरी) : संत-महापुरुषांच्या महान विचारांची परंपरा आणि संविधान निर्मात्यांच्या उदात्त कार्याची ओळख नवी पिढीतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी पारनेर पब्लिक स्कूलने एक स्तुत्य आणि अभिनव उपक्रम राबवला. 'कीर्तनाची पर्वणी' या नावाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमातून राष्ट्रीय समाजप्रबोधनकार ह.भ.प. ज्ञानेश्वर वाबळे महाराज यांनी विद्यार्थ्यांना मोलाचा संदेश दिला. पारनेर पब्लिक स्कूल, ज्याला परिसरातील लोक प्रेमाने 'पारनेर मधील शांतीनिकेतन' म्हणून ओळखतात, तेथे काल ही संस्कारक्षम पर्वणी संपन्न झाली. कीर्तन केवळ मंदिरात किंवा वयोवृद्धांसाठीच नसते, तर ते विद्यार्थ्यांच्या ज्ञानमंदिरातही व्हावे, ही अभिनव संकल्पना शाळेने प्रत्यक्षात आणली.ह.भ.प. ज्ञानेश्वर वाबळे महाराजांनी आपल्या ओघवत्या आणि प्रभावी शैलीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी स्पष्ट केले की, संतांची प्रबोधन परंपरा आणि महामानवांचा लोकोत्तर त्याग हीच आपली खरी 'विरासत' आहे. आजचे हे विद्यार्थी उद्याचे देशाचे सुजाण नागरिक आहेत, त्यामुळे संविधानकर्त्यांचा 'नवभारत' साकारण्यासाठी नव्या युगाच्या या शिलेदारांनी सज्ज असले पाहिजे, असा सांगावा त्यांनी दिला. महाराजांनी शिक्षणाची व्याख्या समजावून सांगताना उपस्थित शेकडो विद्यार्थी आणि गुरुजनांना सांगितले की, शिक्षण म्हणजे संस्कार. जीवनात गुण महत्त्वाचे आहेतच, मात्र त्याहीपेक्षा सदगुण अधिक महत्त्वाचे आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांना अत्यंत मोलाचा संदेश दिला, "तुम्ही डॉक्टर बना, इंजिनियर बना, किंवा कुठल्याही उच्च पदावर जा, पण त्या आधी चांगला माणूस बना."महाराजांनी छत्रपती शिवरायांपासून ते सावित्रीबाई फुले आणि फातेमा शेख यांच्यापर्यंतचा सारा जाज्वल्य इतिहास आपल्या प्रबोधनपर कीर्तनातून अतिशय प्रभावीपणे विशद केला, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्र आणि समाजसेवेची भावना अधिक दृढ झाली.या कार्यक्रमाला ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प. सोपान काका औटी यांची विशेष उपस्थिती होती. तसेच, शाळेतील हजारावर विद्यार्थी, सर्व गुरुजन आणि पारनेर येथील सावित्री-फातेमा सद्भावना मंचचे संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रफिक शेख , ह.भ.प किसनराव पावडे, सचिव भाऊसाहेब औटी, मारुती शेरकर, दत्तात्रय घोडके, शाहूराव औटी, संभाजी औटी,भिकाजी जगदाळे व सहकारी उपस्थित होते.

### दोन विद्यार्थी सुवर्णपदकाची कामगिरी करत राज्यात अव्वल



पारनेर (स. गांवकरी) : कुराश असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांचे वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय सामन्यांमध्ये वडगाव सावताळ येथील १७ वर्ष वयोगट व ७१ किलो वजन गटाखालील विद्यार्थी पै. कु.सुरज रामदास देशमुख व पै. कु.तन्वी दत्तात्रय सरोदे या विद्यार्थ्यांनी उत्तम खेळाचे प्रदर्शन करत महाराष्ट्र राज्या मधून प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदकाची कमाई केली. दि.८ जानेवारी २०२६ रोजी नालंदा, बिहार, येथे होणाऱ्या कनिष्ठ (ज्युनिअर) कुराश राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झालेली असून या खेळात प्राविण्य मिळविण्यासाठी दोन्ही खेळाडूंना प्रा. संजय धोपावकर सर. आंतरराष्ट्रीय खेळाडू मा. आदित्य धोपावकर सर तसेच जवाहर नवोदय विद्यालय टाकळी ढोकेश्वर विद्यालयामध्ये जुडो कुराश खेळाचे प्रशिक्षक मा. पीयुष शिंगारे (नॅशनल गोल्ड मेडलिस्ट) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. दोन्ही खेळाडूंचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.



### नारायण गायकवाड यांचं निधन

कंधार (स. गांवकरी) : जांब (बु) येथील बांधकाम क्षेत्रातील उत्तम कारागीर नारायण भुजंग गायकवाड यांचं काल दिनाक 30 नोव्हेंबर रोजी रात्री 2 च्या सुमारास वयाच्या 55 व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखत निधन झाल आहे. जांब व जांब परिसरातील कामगार चळवळीतील कार्यकर्ता तथा अत्यंत मनमिळाऊ आणि मितभाषी व्यक्ती म्हणून त्यांची परिसरात ओळख. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले तीन बहिणी असा मोठा परिवार आहे. काल त्यांच्यावर त्यांच्या मूळगावी जांब (बु) येथील समशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त करीत आहेत.

### न्यायालय म्हणजे लोकांचा विश्वास

राजगुरुनगर (स. गांवकरी) : न्यायालय म्हणजे केवळ भिंती आणि दालने नव्हे तर न्यायालय म्हणजे लोकांचा विश्वास ,आशा व त्यांची वेदना एकूण घेण्याचे ठिकाण आहे.समाजातील प्रत्येक घटकाला समानतेने ऐकून न्याय देण्याचे काम करतात म्हणून न्यायालय हे न्यायाचे मंदिर आहेत. असे मत मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांनी व्यक्त केले राजगुरुनगर खेड येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे नूतन विस्तारित इमारतीचे उद्घाटन आज मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांचे हस्ते करण्यात आले.

# ठाणे जिल्हा आर एस पी अधिकारी शिक्षक, मुख्याध्यक यांची सहविचार सभा संपन्न

**ठाणे: कल्याण : (समर्थ गांवकरी)**

रस्ता सुरक्षा अभियान २०२६ चा पूर्व नियोजनासाठी पोलिस उपायुक्त पंकज शिरसाट साहेब यांच्या अध्यक्षतेखाली,वाहतूक पी.आय. युवराज सरनोबत साहेब,रस्ता सुरक्षा अभियान विभागीय समन्वय अधिकारी डॉ.मनिलाल शिंपी यांचा मार्गदर्शाखाली व विभागीय मार्गदर्शक माणिक पाटील,ठाणे जिल्हा समन्वय अधिकारी जितेंद्र सोनवणे,उपजिल्हा समादेशक विनोद शेलकर,कल्याण डोंबिवली जिल्हा समन्वय अधिकारी अनंत किनगे,यांचा प्रमुख उपस्थितीत (आर एस पी) विषयाचा प्रचार व प्रसार करणे तसेच, RSP शिक्षक अधिकारी प्रशिक्षण बाबत नियोजन करण्यासाठी पोलीस उपायुक्त वाहतूक विभाग तीन हात नाका ठाणे कार्यालयात सहविचार



बैठक आयोजित करण्यात आली होती.यावेळी ठाणे शहर वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट साहेब यांनी मार्गदर्शन करताना रस्ता सुरक्षा पथक तयार करणे, वाहतूक नियमांबाबत जनजागृती करणे, विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमाबद्दल माहिती देऊन अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी शाळा महाविद्यालय स्तरावरून समाजामध्ये वाहतूक सुरक्षा व वाहतूक नियमांचा प्रचार व प्रसार आणि प्रबोधन व्हावे या दृष्टिकोनातून ठाणे पोलिस आयुक्तालयातील शाळांमध्ये ५ वी ते ७ वी चा वर्गातून वाहतूक नियमांवर आधारित चित्रकला स्पर्धा घेण्यात येणार आहे यासाठी कलाध्यापक संघाचे विभागीय अध्यक्ष दिगंबर बेंडाळे सर व विनोद शेलकर यांच्याकडे सर्व जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच ८वी ते १० वी वर्गातील विद्यार्थ्यांना प्रकल्प ( प्रोजेक्ट ) स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे.प्रत्येक विभागातून पाच स्पर्धकांना पारितोषिक, ट्रॉफी देऊन गौरव करण्यात येणार आहे.तसेच प्रत्येक विभागातून ३ संचलन पथक, व एक बँड पथक असे एकूण ३० पथकांमध्ये साकेत मैदान ठाणे येथे भव्य संचलन स्पर्धा घेण्यात येणार आहे. अशी माहिती यावेळी वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट साहेब यांनी दिली. रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत रस्ता सुरक्षा पथक तयार व्हावे, विद्यार्थ्यांचा माध्यमातून समाजापर्यंत वाहतुकीचे नियम प्रत्येक घरात गेले पाहिजेत, आर एस पी पथकाचे कार्य आणि महत्व वाढवण्यासाठी ठाणे शहर वाहतूक पोलिस उपायुक्त पंकज शिरसाट साहेब यांच्या आदेशानुसार व ठाणे जिल्हा माध्यमिक शिक्षण अधिकारी माननीय देविदास महाजन साहेब व जिल्हा प्राथमिक शिक्षण अधिकारी डॉ.बाळासाहेब राक्षे यांचा मार्गदर्शनाखाली दिनांक 5 डिसेंबर २०२५ ते 7 डिसेंबर २०२५ यादरम्यान ठाणे शहर वाहतूक पोलिस उपायुक्त कार्यालय तीन हात नाका, ठाणे पश्चिम येथे आर एस पी शिक्षक अधिकारी यांचे प्रशिक्षण, विभागीय समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) श्री.मनिलाल शिंपी, व श्री.दिलीप स्वामी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केले आहे. या प्रशिक्षणासंबंधी ऑनलाइन अर्ज भरणे, नोंदणी करणे, आर.एस. पी.अधिकारी गणवेश इत्यादी बाबतची सविस्तर माहिती विभागीय समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) मनिलाल शिंपी यांनी सविस्तर माहिती दिली. शाळेतआर एस पी हा विषय राबविन्यासाठी बालभारती कडून रस्ता सुरक्षा विषयाचे पाठ्यपुस्तकपुस्तक इयत्ता नववी व दहावीसाठी तयार करण्यात आले आहे.एसएससी बोर्डाचा या विषयाचा P-5 हा सांकेतांक आहे. इयत्ता पहिली ते दहावी हा विषय कसा राबवावा इत्यादी बाबत सविस्तर माहिती अनंत किनगे यांनी दिली.

# अध्यात्म आघाडी प्रमुख म्हणून डॉ. किशोर रमेश देशपांडे यांची नियुक्ती

**कळवण : (समर्थ गांवकरी)**

आगामी नगरपंचायत, महानगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपाचा संवाद मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यात भाजप प्रवक्त्या व माजी केंद्रीय मंत्री डॉ. भारती ताई पवार, आमदार डॉ. राहुल आहेर, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सभेदरम्यान डॉ. किशोर रमेश देशपांडे यांची भाजपा कळवण तालुका अध्यात्म आघाडी प्रमुख म्हणून निवड करण्यात आली. पक्ष संघटनेत अध्यात्म आघाडीला चालना देण्यासाठी आणि कार्यकर्त्यांमध्ये सकारात्मक, मूल्याधिष्ठित विचारप्रणाली रुजवण्यासाठी देशपांडे यांची नियुक्ती महत्त्वाची ठरणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.नियुक्ती जाहीर होताच समाजातील सर्व स्तरातून डॉ. देशपांडे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव झाला. त्यांच्या नेतृत्वाखाली कळवण तालुक्यात अध्यात्मिक जनजागृती व सामाजिक बांधिलकीचे उपक्रम अधिक बळकट होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# सागरमल मोदी शाळेत वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात संपन्न

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

नाशिक एज्युकेशन सोसायटीच्या सागरमल मोदी प्राथमिक शिक्षण मंदिर शाळेत वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या शारीरिक-मानसिक विकासासाठी तसेच स्पर्धात्मकता व टीमस्पिरिट वृद्धिंगत करण्यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही हा महोत्सव भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक तथा कार्यवाह राजेंद्र निकम यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून पेठे विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक कैलास पाटील, सुप्रसिद्ध उद्योजक जयवंत बधान, संस्था




सहकार्यवाह पंढरीनाथ बिरारी, शिक्षक प्रतिनिधी अशोक शिरुडे, दुपार सत्र प्रमुख मनीषा जोशी, क्रीडा समिती प्रमुख राहुल चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, हनुमंतरायाच्या मूर्तीचे पूजन आणि नारळ वाढवून शुभारंभाने झाली. फुग्यांचे लोकार्पण करून क्रीडा महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी जम्प रोप, ५० मीटर धावणे, शटल रन, लंगडी-पळी, बुद्धिबळ अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्तम क्रीडास्पिरिट दाखवत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

प्रमुख अतिथी कैलास पाटील व उद्योजक जयवंत बधान यांनी विद्यार्थ्यांना सकारात्मक दृष्टीकोन बाळगण्याचा, नियमित व्यायाम करण्याचा आणि पराभव-यश या दोन्हींकडे समानतेने पाहण्याचा संदेश दिला. मुख्याध्यापक राजेंद्र निकम यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत सर्वांना यशस्वी स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. दुपार सत्रातील बक्षीस वितरण समारंभात सी.डी. मेरी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक मधुकर पगारे व उंटवाडी प्राथमिक शाळेच्या माजी मुख्याध्यापिका उज्वला कासार प्रमुख उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्वसामान्य कुटुंबातील उमेदवारांना विजयी करा

**जामखेड तालुका (समर्थ गांवकरी)**

भाजप व राष्ट्रवादीच्या दोन्ही आमदारांची दोन टर्म झाली आहे पण शहराला आठ दिवसाआड पाणी, रस्त्याचे अर्धवट कामे व धुळीने माखलेले शहर, औद्योगिक वसाहतीला खोडा व श्रेयवादाची लढाई करायची अशी परस्थिती असताना निवडणूक आली की दोन्ही आमदार तळ ठोकून बसतात व विकासाच्या गप्पा मारतात राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्वसामान्य कुटुंबातील उमेदवारांना विजयी करून त्या दोघांना धडा शिकवा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) स्टार प्रचारक सुनिल आण्णा शेळके यांनी नगरपरिषद निवडणुकीच्या शुक्रवारी झालेल्या जाहीर सभेत केले.जामखेड नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारार्थ झालेल्या जाहीर सभेत स्टार प्रचारक सुनिल आण्णा शेळके बोलत होते.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष महेश निमोणकर, प्रदेश युवती अध्यक्ष संध्या सोनवणे, राष्ट्रवादी तालुकाउपाध्यक्ष बापूराव शिंदे, युवा नेते अक्षय शिंदे, कर्जत तालुकाध्यक्ष बाळासाहेब शिंदे, सुरज रसाळ, नगराध्यक्ष उमेदवार सुवर्णा निमोणकर, नगरसेवक पदाचे उमेदवार सारिका डोळे, सुरज निमोणकर, द्वारका पवार, पूजा शिंदे, नजमा सय्यद, मिठूलाल नवलाखा, गणेश काळे, मुक्ता म्हेत्रे, शेख सलाउद्दीन, ताहेरा शेख, महेश निमोणकर आदी उपस्थित होते.यावेळी बोलताना आ. सुनिल आण्णा शेळके म्हणाले, नगरपरिषद निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेचे सभापती प्रा राम शिंदे,आ.रोहीत पवार यांनी सभा घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसच्या एक सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती महेश निमोणकर यांना घेरण्याचे काम करत आहेत.

पण आ. सुनिल शेळके तुमचा भाऊ म्हणून तुमच्या पाठीशी भक्कम पणे उभा आहे. मला ही मावळमध्ये असेच घेरले होते व सर्व सत्ता त्यांच्या बाजुने होती पण माझ्या माघे उपमुख्यमंत्री अजितदादा दुरदृष्टी असलेले नेते आहेत. तुम्ही त्यांना निवडून द्या अजितदादा या शहराचा चेहरामोहरा बदलून टाकतील.



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

शिवशंभो फौंडेशनच्या माध्यमातून स्वातंत्र्यवीर सावरकर नगर या ठिकाणी महिलांसाठी घरगुती व्यवसाय शिबिराचे आयोजन आज पार पडले त्यामध्ये महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रसंगी कांचन पवार, पूजा कांबळे, साधना देशमुख, राजश्री देशमुख, स्मिता बागवे या महिलांनी सहकार्य केले तर शिवशंभो फाउंडेशनच्या अध्यक्ष सौ. भारती भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. ( फोटो - संतोष पडवळ )

# राज्यव्यापी 'शिव पाणंद' शेतरस्ता जनजागृती अभियानाचा मंत्रालयात शुभारंभ

## शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचा मंत्रालयातून ऐतिहासिक एल्गार

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

तमाम महाराष्ट्रातील शेवटच्या शेतकरी भावापर्यंत दर्जेदार शेतरस्ता पोहोचवण्याच्या उद्देशाने सुरू झालेली 'शिव पाणंद शेतरस्ता चळवळ' आता निर्णायक टप्प्यात पोहोचली असून, शासन निर्णयांच्या अंमलबजावणी साठी या चळवळीने मंत्रालयातून ऐतिहासिक एल्गार केला आहे.

"शेत तिथे रस्ता - गाव तिथे समृद्धी" हा नारा प्रत्यक्षात उतरवण्यासाठी चळवळीने एकात्मता, सामूहिक नेतृत्व आणि व्यापक जन भागीदारीचा मार्ग स्वीकारला आहे. गुरुवार, २७ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यभरातील पदाधिकाऱ्यांची समन्वय बैठक आझाद मैदान, मुंबई येथे झाली. आगामी आंदोलन, जनजागृती आणि प्रशासनाशी संवाद याबाबत महत्त्वपूर्ण रणनीती ठरवण्यात आली. राज्य सरकार, प्रशासन आणि न्यायालयीन पातळीवर सातत्याने पाठपुरावा करत अनेक जिल्ह्यांत संघटन बळकट करण्यात चळवळीला यश आले. या संघर्षाचे फलित म्हणून सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक ऐतिहासिक निर्णय घोषित केले असून, चळवळीच्या वतीने सरकारचे आभार व्यक्त करण्यात आले. या निर्णयांची जिल्हा आणि तालुका पातळीवर प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी पदाधिकारी मंत्रालयात भेट देत संबंधित विभागांना निवेदने सादर करत आहेत. याच पार्श्वभूमीवर मंत्रालयातून राज्यव्यापी 'शिव पाणंद' शेतरस्ता जनजागृती अभियानाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. हे अभियान गाव, तालुका आणि जिल्हा पातळीवर मोठ्या प्रमाणात राबवून शासन निर्णयांचा लाभ प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.



या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, अॅड. सागर जोरी, अॅड. प्रणाली यवले, शांताराम पानमंद, जेष्ठ पत्रकार शिवाजी राऊत, सचिन शेळके, रामहरी बोंबे, दत्तात्रय बांगर, सुरेश भुजबळ, संजय साबळे, बबन गुंड, भाऊसाहेब वाळूंज, दशरथ वाळूंज, संजय जाधव, संजना जाधव, स्वप्रील कोहकडे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.